दैनिक राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com
बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–३९ सोमवार दि.२० मे २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

संपादकीय

शेवटच्या टप्पा कोणाला कौल देणार...

महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीचा पाचवा आणि शेवटचा टप्पा सोमवारी पार पडत आहे. या टप्प्यात देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईसह ठाणे, पालघर, नाशिक आदी १३ लोकसभा मतदारसंघात निवडणूक होत आहे. यातील काही मतदारसंघांचा अपवाद वगळता अन्यत्र भाजपा व शिंदे गटाचा चांगलाच कस लागला आहे.

देशात ४९ तर राज्यात १३ जागांसाठी आज मतदान

नवी दिल्लीः देशभरातील ८ राज्ये व केंद्रशासित प्रदेशातील एकूण ४९ मतदारसंघांमध्ये सोमवारी, २० मे रोजी मतदान होत आहे. यामध्ये महाराष्ट्रातील १३ मतदारसंघांचा समावेश आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी, केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्यासह स्मृती इराणी, नॅशनल कॉन्फरन्सचे नेते ओमर अब्दुल्ला यांचे भवितव्य सोमवारी ईव्हीएम मध्ये बंद होणार आहे. उत्तर प्रदेशातील रायबरेलीत राहुल गांधी यांचा सामना भाजपचे दिनेश प्रताप सिंह यांच्याशी आहे. अमेठीत भाजपच्या स्मृती इराणी यांची लढत काँग्रेसचे किशोरीलाल शर्मा यांच्याशी आहे.

शेतकऱ्यांच्या एफआरपीवर कारखान्यांचा डल्ला

राजू शेट्टींचे साखर आयुक्तांना पत्र

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील साखर कारखान्यांकडे एफआरपीची रक्कम अदा करुन पैसे शिल्लक राहिले आहेत. या पैशावरती शेतकऱ्यांचा अधिकार आहे. पण राज्यातील सर्व पक्षाचे साखर कारखानदार एक होऊन, या पैशांवर डल्ला मारण्याचा प्रयत्न करत आहेत, असा आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी केला आहे. याबाबत राजू शेट्टींनी साखर आयुक्त कुणाल खेमणार यांना पत्र लिहले आहे.

राज्यात सध्या ऊस गाळप हंगाम संपला असून, अनेक कारखान्यांकडे शेतकऱ्यांच्या उसाच्या एफआरपीचे पैसे शिल्लक आहेत. या पैशांवर शेतकऱ्यांचा अधिकार आहे. मात्र, राज्यातील सर्व पक्षाचे साखर कारखानदार एकत्र येऊन, या पैशावरती डल्ला मारण्याचा प्रयत्न करत आहेत. परिणामी, गतवर्षी हंगामात झालेली चूक कारखानदारांनी न करता यावर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत विषय पत्रिकेवर विषय घेऊन एफआरपी पेक्षा जादा रक्कमेला मंजूरी देण्याबाबत कारखान्यांना लेखी आदेश निर्गमित करावा. अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी साखर आयुक्त कुणाल खेमणार यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. मागील दोन वर्षापासून केंद्र सरकारच्या धोरणामुळे देशातील साखर ◀◀ पान २ वर

तर शेतकऱ्यांना फायदा होणार

» राज्याच्या साखर आयुक्तांनी थकबाकी शिल्लक असलेल्या सर्व कारखान्यांना वार्षिक सर्वसाधारण सभेत विषय पत्रिकेवर घेऊन, या विषयास मंजूरी घेण्याबाबत लेखी आदेश काढावेत, अशी मागणी केली आहे. ज्यामुळे राज्यातील सर्व कारखान्यांना लेखी आदेश काढत, या विषयास साखर कारखान्यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभामध्ये हा शेतकरी हिताचा निर्णय झाल्यास, याचा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. असेही शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी साखर आयुक्तांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे.

अन् नात्याला पाझर फुटला नाही!

आई–वडीलांचे बिनसले; रक्ताच्या नात्यातील लोकांनी तीन चिमुकल्यांना गावच्या पुलावर सोडले

माजलगाव । प्रतिनिधी

तीन चिमुकल्या मुलांना त्यांच्या नातेवाईकांनी माजलगाव तालुक्यातील पुंगनी गावच्या पुलावर बेवारस सोडून दिले. ही घटना दि १९ मे रविवार रोजी गावकऱ्यांच्या लक्षात आली. पोलिसांनी मुलांना ताब्यात घेऊन अनाथ ◀◀ पान २ वर

परळी मतदार संघ ठरवणार बीडचा खासदार?

» धनंजय मुंडे ठरणार का किंगमेकर; आष्टी, गेवराई, बीडकडेही नजरा

विशेष प्रतिनिधी । बीड

कधी नव्हे ते यावेळी लोकसभा निवडणुकीला जातीय रंग आल्याने कोणाचे पारडे जड आहे, हे सुध्दा निश्चितपणे कोणालाही सांगता येत नाही. परळी विधानसभा मतदार संघ हा मुंडे बहिण – भावाचा बालेकिल्ला असल्याने पंकजाताई मुंडे यांना सर्वाधिक मताधिक्य याच मतदारसंघातून मिळणार असल्याचा अंदाज आहे. त्यामुळे परळी मतदारसंघ बीडचा कोण खासदार होणार हे ठरवणार असल्याचे दिसते. त्यावेळी धनंजय मुंडे हे किंगमेकरच्या भुमिकेत दिसणार आहेत. महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांची बीड, गेवराईवर तर भाजपच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांची आष्टी आणि परळी मतदार संघावर मदार आहे. तर केज आणि माजलगाव मतदार संघा कोणाला कौल देतात, यावरच सर्व काही अवलंबून आहे.

दिवंगत गोपीनाथ मुंडे हे पहिल्यांदा २००९ मध्ये बीडमधून निवडून आल्यावर हा मतदार संघा मुंडे घराण्याचा बाल्लेकिल्ला बनला. २०१४ मध्ये मुंडे विक्रमी मतांची दुसऱ्यांदा निवडून आल्यावर केंद्रात मोदी सरकारमध्ये मंत्रीही बनले, मात्र नियतीला वेगळाच डाव साधायचा होता. अपघातात मुंडे साहेबांचा मृत्यू झाला आणि झालेल्या पोटनिवडणुकीत प्रितमताई मुंडे यांना उमेदवारी देण्यात आली. पुढे २०१९ मध्ये त्या १ लाख ६८ हजार मतांनी पुन्हा बीडमधून खासदार झाल्या. यावेळी त्यांनाच उमेदवारी मिळेल असे वाटत असाताना पंकजाताई मुंडे यांना उमेदवार देण्यात आली. तर दुसरीकडे महाविकास आघाडीने बजरंग सोनवणे यांना पुन्हा उमेदवारी दिली. यावेळी मोदी लाट कोठेच दिसली नाही, मात्र जरांगे फॅक्टर बीड लोकसभा निवडणुकीच्या वातावरणात पुर्णत: घुसला. त्यामुळे पंकजा मुंडे यांना हि निवडणुक जड गेली. ओबीसी विरुध्द मराठा असा सामना या निवडणुकीत पाहायला मिळाला. दि. १३ मे रोजी मतदान होऊन १५ लाख १९ हजार ५२३ मतदारांनी आपला हक्क बजावला. मतदान झाले तरी कोणत्या विधानसभा मतदार संघात कोणाचे पारडे जड आहे, हे अजूनही स्पष्टपणे सांगता येत नाही. पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी निवडणुका लागल्यापासून मतदार संघातील यंत्रणा स्वत:च्या हाती घेत पंकजाताईच्या प्रचाराची धुरा आपल्या खांद्यावर घेतली. त्यामुळे पंकजाताई मुंडे यांना होणारा त्रास त्यांनी स्वत:वर घेतला.

बीड मतदार संघात वंजारी समाजाची मतदार संख्या ही अंदाजे २५ हजाराच्या आसपास आहे. तर ओबीसी समाजाचे झालेले मतदान हे ४१ हजार असण्याचा अंदाज आहे. तर मराठा समाजाचे मतदान हे ८० हजाराच्या आसपास झाल्याचा अंदाज असून मुस्लिम समाजाचे ४७ हजार मतदान झाले असल्याची चर्चा आहे. तर मागासवर्गीय समाजाचे ३३६०० मतदान झाले असल्याचा ◀◀ पान २ वर

गेवराई मतदारसंघाचा मुड काय?

» या मतदार संघात वंजारी समाजाची मतदार संख्या कमी आहे, पण धनगर समाजाची संख्या बरीच आहे. त्यामुळे एकूण ओबीसी आणि मराठा समाज जवळपास सारखाच आहे. पण मुस्लिम समाज हा या मतदार संघात बजरंग सोनवणे यांच्यासाठी जमेची बाजू आहे. त्यामुळे १५ ते २० हजाराचे मताधिक्य त्यांना मिळेल, असे म्हटले जात आहे. पण जर यापेक्षा जास्त मताधिक्य सोनवणे यांना मिळाले तर पंकजा मुंडे यांच्यासाठी धोक्याची घंटा ठरु शकते.

विकृत मानसिकतेतून परळी शहरात गोंधळ

गाडीची तोडफोड,नगदी रोख लंपास

परळी । प्रतिनिधी

परळीतील शांत व सुसंस्कृत भाग असलेल्या पद्मावती कॉलनी मध्ये राजकीय कार्यकर्त्याची घरासमोर लावलेली गाडी तलवारीचे घाव घालून फोडल्याची घटना तर याच भागात असलेल्या सोहम गॅस या दुकानातील नगदी २७ हजार रु हिसकावून घेण्याची घटना एकाच दिवशी घडली.या प्रकरणी दोन गुन्हे संभाजी नगर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आले आहेत.

शहरातील पद्मावती भागात रहिवासी असलेले राहुल रामचरण केंद्रे (वय ४१) हे शनिवार दि १८ रोजी सायंकाळी ८ वा. सुमारास त्यांची क्रेटा .–२५, २५९९ ही कार घरासमोर असलेल्या हनुमान मंदीरा समोर लावलेली असताना आरोपी आकाश लिंबाळकर याने कारवर तलवारीने मारून काचा फोडल्या तसेच गाडीच्या डाव्या बाजुला व बोनेटवर दगड मारून पाठीमागील काच तलवारीने फोडत होता. त्यास फोडु नको असे म्हणताच तो पळुन गेला याच ◀◀ पान २ वर

आरक्षणाची मर्यादा वाढवणार की नाही?

» काँग्रेसचा मोदी यांना थेट सवाल

नवी दिल्ली । वृतसंस्था

लोकसभा निवडणुकीसाठी चार टप्प्यातील मतदान झाले असून, सोमवार दि. २० मे रोजी पाचव्या टप्प्यातील मतदान होत आहे. या पार्श्वभुमीवर काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी आरक्षण आणि जातीवर आधारित जनगणनेच्या मुद्यावरून भाजपवर जोरदार टीका केली. तसेच, मनमोहनसिंग सरकारमध्ये २०११ साली झालेल्या जनगणनेबाबत आणि

आरक्षणाच्या मर्यादेबाबत भाजपला प्रश्न विचारला.

काँग्रेस नेते जयराम रमेश म्हणाले देशभरातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि मागासवर्गीयांना आरक्षणाचे पूर्ण अधिकार मिळाले पाहिजेत आणि त्यासाठी जातगणना गरजेची आहे. २०११ साली मनमोहन सरकारमध्ये आर्थिक, सामाजिक

आणि जातीय जनगणना झाली होती. त्या अहवालात जातीय जनगणनेबाबत जी माहिती मिळाली, ती समोर येऊ शकली नाही, कारण त्याला तीन वर्षे लागली आणि तोपर्यंत मोदींचे सरकार आले होते. मोदींनी ती माहिती समोर येऊ दिली नाही असे जयराम रमेश म्हणाले. मोदी सरकार सामाजिक, आर्थिक आणि जातीय जनगणनेच्या बाजूने आहे की नाही, याचे त्यांनी अद्याप स्पष्टीकरण दिलेले नाही. १९९२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने मंडल आयोगाच्या संदर्भात निर्णय दिला होता, ज्यामध्ये एससी, एसटी आणि ओबीसीसाठी ५० टक्के आरक्षणाची मर्यादा असणे आवश्यक असल्याचे सांगितले होते. ◀◀ पान २ वर

तलवारीने केक कापणे अंगलट

» सहा जणांवर गुन्हा दाखल

दिंद्रुड । प्रतिनिधी

वाढदिवसाच्या दिवशी तलवारीने केक कापणे एका तरुणाच्या आणि त्याच्या मित्रांच्या अंगलट आले. शस्त्र दाखवून दशहत पसरवल्याप्रकरणी दिंद्रुड पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. माजलगाव तालुक्यातील ◀◀ पान २ वर

जूनमधील शैक्षणिक प्रवेशापूर्वी आरक्षण गरजेचे–जरांगे

नाशिकच्या उमेदवाराला पाठिंबा नाही

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

जूनमध्ये सुरू होणाऱ्या शैक्षणिक प्रवेशापूर्वी मराठा समाजाला आरक्षण मिळणे गरजेचे आहे. दरम्यान येत्या ४ जूनला उपोषणाला बसणार असल्याचे सांगत मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे आपण उपोषणावर ठाम असल्याची भूमिका स्पष्ट

केली. जरांगे यांच्यावर शहरातील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. रविवारी (दि.१९) ते माध्यमांशी बोलत होते.

जरांगे पुढे म्हणाले, समाज बांधवांची इच्छा होती मी उपोषण करू नये. मात्र त्यांच्याच लेकराच्या ◀◀ पान २ वर

आनंदाची बातमी! दक्षिण अंदमानच्या समुद्रात मान्सूनचे आगमन

नवी दिल्ली । वृतसंस्था

भारतीय हवामान विभागाने मान्सूनच्या आगमनावरून अंदाज वर्तवताना तो ३१ मे पर्यंत देशाचे प्रवेश करेल असे सांगितले होते. यादरम्यान आता शेतकऱ्यांसह देशातील सर्वसामान्यांसाठी आनंदाची बातमी आली असून, मान्सून पुढे सरकत आहे. दक्षिण अंदमानच्या सागरात मान्सूनच्या सरी बरसल्याची माहिती भारतीय हवामान खात्याने त्यांच्या अधिकृत

वेबसाईटवर रविवारी (ता.१९) दिली आहे. विभागाने मान्सूनच्या आगमानाबाबतची माहिती देताना मालदीव, कोमोरिनचा काही भाग आणि बंगालच्या उपसागराच्या काही भागात पाऊस झाल्याचे म्हटले आहे. यासह निकोबार बेटे आणि दक्षिण अंदमानच्या समुद्रात देखील मान्सून दाखल झाला असून, निकोबार बेटांवर गेल्या २४ तासात जोरदार पाऊस झाल्याचेही विभागाने म्हटले आहे. याआधी हवामान खात्याने नैऋत्य मान्सूनच्या आगमनाबाबत अंदाज व्यक्त केला होता. ◀◀ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१८ मे २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू : २१.५० क्विंटल			
	२,०६१	२,८७१	२,२९१
ज्वारी/हायब्रिड : ७४.५० क्विंटल			
	१,५००	३,०००	२,४२१
मूग : ०.५० क्विंटल			
	९,८५०	९,८५०	९,८५०
तूर : ३३.५० क्विंटल			
	११,३००	११,६६०	११,४९६
उडीद : ५.५० क्विंटल			
	७,९००	७,९०१	७,९००
बाजरी: १८.५० क्विंटल			
	२,४००	२,६१३	२,५०६
चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल			
	१,७००	६,३००	४,०००
सोयाबीन: ७९.५० क्विंटल			
	४,५००	४,५५०	४,५३८
हरभरा: ४.५० क्विंटल			
	५,७०१	५,८३०	५,७७६

बांधकामाच्या नावाखाली वैद्यनाथ मंदिराची ओळख नष्ट करण्याचा प्रयत्न

परळी । प्रतिनिधी

परळी येथील बारा ज्योतिर्लिगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथ मंदिराचा विकास आराखड्यास शासनाने मंजुरी दिल्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात आली आहे.या बांधकामाच्या नावाखाली वैजनाथ मंदिराचे ऐतिहासिक ओळख नष्ट करण्याचा प्रयत्न होत . राष्ट्रमाता अहिल्याबाई होळकर यांनी जिर्णोद्धारात केलेले ऐतिहासिक जुने बांधकाम पाडले जात आहे. यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होताना दिसत आहे.काम सुरू करताना मंदिराची पुरातन ओळख पुसली जाणार नाही याचे जतन करुनच मंदिराचा कायापालट केला जाईल असे सांगण्यात आले होते. मात्र सध्या पूर्व भागाच्या बाजूने दर्शन मंडपाचे काम सुरू करण्यात आले असून याबाजूला असणाऱ्या काही पायऱ्या तोडून बांधकामासाठी रस्ता तयार करण्यात आला आहे. यामुळे

मंदिराची जुनी ओळख पुसणार तर नाही ना असा प्रश्न परळीकरांना पडला आहे.

बारा ज्योतिर्लिगापैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथ मंदिराचा कॉरीडॉरच्या माध्यमातून विकास करावा अशी मागणी येथील नागरीकांनी केली होती. या मागणीसाठी मंत्री धनंजय मुंडे यांनी सातत्याने पाठपुरावा केला. मंत्रालयात ◀◀ पान २ वर

विकास आराखड्यात होणारी कामे..

या विकास कामामध्ये भक्तांसाठी दर्शन बारी, प्रतिक्षालय, धर्मशाळा, दक्षिण मुखी गणेश मंदिर परिसरात भक्त निवास, वाहनतळ, परिसरात ठिकठिकाणी स्वच्छतागृहे, मेरू पर्वतावर कॉटेजेस, उपहार गृह, अत्याधुनिक साउंड सिस्टीम, डिजिटल दर्शन सोय, मेरू पर्वतावर उद्यान विकसित करणे वैद्यनाथ मंदिराच्या पुर्वेस हरिहर तिर्थाजवळ दर्शन मंडपाचे बांधकाम व परिसर सुधारणा करणे, दक्षिणमुखी गणेश मंदिराच्या पाठीमागे यात्री निवास बांधकाम व परिसर सुधारणा,शनी मंदिराच्या पाठीमागे धर्मशाळा यात्री निवास बांधकाम, परिसर सुधारणा, मेरु पर्वतावर उद्यान विकसित करणे, वैद्यनाथ मंदिर भोवतालीदगडी फरशी बसवणे, नगरपालिकेजवळ सुंदर वास्तूशिल्प प्रवेशद्वार, मेरु पर्वताभोवती संरक्षण भिंत, मेरु पर्वताभोवती प्रदक्षिणा मार्ग तयार करणे, हरिहर तिर्थाभोवती उद्यान विकसित करणे, संरक्षण भिंत, कारंजे, विद्युत रोषणाई आदि कामे, शहरात हँलीपँड विकसित करणे, डोंगरतुकाई मंदिराच्या आजूबाजूला संरक्षण भिंत, सभामंडप, धर्मशाळा,उद्यान विकसित करणे ही व अशी एकूण ९२ कामे करण्यात येणार आहेत.

अग्रलेख

शेवटच्या टप्पा कोणाला कौल देणार...

महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीचा पाचवा आणि शेवटचा टप्पा सोमवारी पार पडत आहे. या टप्प्यात देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईसह ठाणे, पालघर, नाशिक आदी १३ लोकसभा मतदारसंघात निवडणूक होत आहे. यातील काही मतदारसंघांचा अपवाद वगळता अन्यत्र भाजपा व शिंदे गटाचा चांगलाच कस लागला आहे. महाविकास आघाडीने महायुतीपुढे उभे केलेले आव्हान पाहता मुंबईसह एकूणच महाराष्ट्रातील निकालाबाबत उत्सुकता असेल. आधीच्या चार टप्प्यांमध्ये मतांच्या टक्केवारीत काहीशी घटच दिसून आली. त्यामुळे पाचव्या टप्प्यात मुंबईतील सहा जागांसह ठाणे, कल्याण, भिवंडी, पालघर, नाशिक, दिंडोरी, धुळे या १३ जागांवर किती मतदान होते, मुंबईकरांशिवाय इतर भागांतील जनता मतदानासाठी बाहेर पडते का, याकडे सर्वांचे लक्ष असेल.

मुंबई आणि शिवसेना हे समीकरण मानले जाते. १९६६ साली स्थापन झालेल्या सेनेला मागच्या ६० ते ६५ वर्षांत अनेक संकटांशी सामना करावा लागला. मात्र, सेनेचा हा गड अभेद्य राहिला. परंतु, आत्ताचे संकट हे सर्वार्थाने वेगळे असून, मुंबईत प्रामुख्याने ठाकरे सेना विऊद्ध शिंदे सेना अशाच लढती होत आहेत. दक्षिण मुंबईत ठाकरे सेनेचे अरविंद सावंत व भायखळ्याच्या शिंदे गटाच्या आमदार यामिनी जाधव यांच्यात लढत होत आहे. बेहिशेबी मालमत्ता प्रकरणात जाधव यांच्या पतीचे नाव पुढे आले होते. त्यामुळे त्यांची उमेदवारी तशी वादग्रस्त ठरलेली दिसते. स्वाभाविकच ही जागा ठाकरसेनेसाठी सेफ मानली जाते. उत्तर पश्चिम मुंबईत ठाकरे सेनेचे अमोल कीर्तिकर विरूद्ध शिंदेसेनेचे आमदार रवींद्र वायकर असा सामना आहे. अगदी अखेरच्या टप्प्यात ईडी चौकशीच्या फेऱ्यात अडकलेल्या वायकर यांना पक्षात घेण्यात आले व शिंदेसेनेकडून उमेदवारी देण्यात आली. त्यात ऐन प्रचाराच्या रणधुमाळीत चौकशीच्या ससेमिऱ्यामुळे आपण शिंदे गटात आल्याचे वायकर यांनी स्पष्ट बोलून सांगितले. त्यामुळे सेनेच्या हातात आयतेच कोलीत मिळाले. वायकर मनाने अजूनही उद्धव ठाकरेंजवळच असल्याचेच हे द्योतक ठरावे. याशिवाय खिचडी घोटाळाप्रकरणी कीर्तिकरांवरही आरोप आहेत. त्यामुळे दोघांमध्ये कुणाला पसंती मिळणार, याविषयी उत्सुकता असेल. दक्षिण मध्य मुंबईत शिंदेसेनेचे राहुल शेवाळे विऊद्ध ठाकरेसेनेचे अनिल देसाई यांच्यातही चुरशीची लढत असेल. धारावी पुनर्विकासाच्या मुद्द्यावर शेवाळे यांच्याबद्दल असलेली नाराजी, दहा वर्षांत मतदारसंघात प्रभाव पाडण्यात आलेले अपयश याबाबी त्यांना अडचणीच्या ठरू शकतात. ईशान्य मुंबईत ठाकरे सेनेचे संजय दिना पाटील व भाजपाचे मिहिर कोटेचा यांच्यातील लढतही रंगतदार असू शकते. याच मतदारसंघात घाटकोपर परिसर मोडतो. येथील होर्डिंग दुर्घटनेत १४ जणांना प्राण गमवावे लागले होते. त्यानंतर याच भागात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा रोड शो झाला होता. त्यावरून विरोधक सत्ताधाऱ्यांना घेरण्याचा प्रयत्न करीत आहेत. तर दुसरीकडे मराठा विऊद्ध गुजरात हा वादही येथे उफाळून आलेला दिसतो. त्यामुळे यात पाटील वा कोटेचा यांच्यापैकी कुणाची सरशी होते, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. उत्तर मध्य मुंबई व उत्तर मुंबईत काँग्रेस व भाजपा समोरासमोर असतील. तेथे ठाकरे सेनेची भूमिका निर्णायक असेल. उत्तर मध्य मुंबईत भाजपाचे उज्ज्वल निकम व आमदार वर्षा गायकवाड यांच्यातही काट्याची टक्कर होईल. निकम यांच्या मागे भाजपाची मजबूत यंत्रणा व उत्तर भारतीय, जैन, मारवाडी मतपेढी असेल. तर वर्षाताईंमागे दलित, मुस्लिम, ख्रिश्चन मतांशिवाय सेनेचा कट्टर मतदार राहू शकतो. उत्तर मुंबई हा भाजपाचा बालेकिल्ला. गोपाळी शेट्टींऐवजी भाजपाने येथून पियूष गोयल यांना रिंगणात उतरवले आहे. तर काँग्रेसने नवख्या भूषण पाटील यांना तिकीट दिले आहे. येथून क्वचितच काँग्रेसला विजय मिळाला आहे. गोयल यांच्या मांसाहाराबाबतच्या टिप्पणीमुळे मराठी-गुजराती हा मुद्दा येथेही ऐरणीवर आल्याचे दिसून येते. येथील भाजपाची हक्काची व्होटबँक बघता पाटील किती आव्हान देतात, हेच पहायचे.

ठाणे व कल्याण लोकसभा हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे गृहमैदान. त्यामुळे तेथे त्यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. कल्याणमध्ये तर त्यांचे पुत्र डॉ. श्रीकांत शिंदे हे मैदानात आहेत. त्यामुळे आपले अस्तित्व सिद्ध करण्यासाठी या दोन्ही जागा त्यांना जिंकाव्या लागतील. पालघरमध्ये सेनेच्या भारती कामडी, भाजपाचे हेमंत सावरा आणि बहुजन विकास आघाडीचे राजेश पाटील यांच्यात तिरंगी लढत आहे. हितेंद्र ठाकूर यांच्या पक्षाचा पुन्हा भाजपालाच फायदा होणार का, हेही पहावे लागेल. भिवंडीत महायुतीचे कपिल पाटील आणि महाविकास आघाडीचे सुरेश म्हात्रे यांच्यातील लढतही लक्षवेधक म्हणता येईल. धुळ्यातील निवडणूकही आता पूर्वीसारखी सोपी नाही. भाजपाच्या डॉ. सुभाष भामरे यांना काँग्रेस नेत्या डॉ. शोभा बच्छाव यांनी कडवे आव्हान दिल्याचे दिसते. नाशिक व दिंडोरी मतदारसंघात कांद्याचा प्रश्न चांगलाच गाजतो आहे. अगदी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही कांदाप्रश्नाच्या दाहकतेची झळ सहन करावी लागली. मोदींच्या सभेत कांदा प्रश्नावरून करण्यात आलेली घोषणाबाजी, त्याला मोदींनी जय श्रीराम, असे दिलेले उत्तर यामुळे वातावरण अधिकच पेटले आहे. कांद्याच्या मुद्द्यावर शेतकऱ्यांमध्ये असलेली नाराजी नाशिक, दिंडोरीशिवाय इतरही भागात आहे. त्यामुळे अन्य मतदारसंघांमध्येही भाजपाला त्याचा फटका बसण्याची चिन्हे आहेत. दिंडोरीत भाजपाने पुन्हा केंद्रीय राज्यमंत्री भारती पवार यांना उमेदवारी दिली असली, तरी युतीधर्माचे पालन होताना दिसत नाही. झिरवळ वगैरे मंडळी तुतारी वाजवतानाच पहायला मिळतात. त्यात दादांनीही अलीकडे प्रकृतीचे कारण देत प्रचारातून अंग काढून घेतल्याचे दिसते. खरे तर २०१४, २०१९ पेक्षा ही निवडणूक वेगळी आहे. महाराष्ट्रातील फोडाफोडीच्या राजकारणाचा या निवडणुकीवर मोठा परिणाम झाला आहे. प्रारंभी महायुती व महाविकास आघाडीला समसमान जागा मिळतील, असा अंदाज होता. मात्र, आघाडीच्या जागा वाढण्याची चिन्हे आहेत. याचा महाराष्ट्राच्या राजकारणावर निश्चित दूरगामी परिणाम होईल.

केजरीवालांच्या घरातील सीसीटिव्ही, डीव्हीआर जप्त

नवी दिल्ली । वृतसंस्था

दिल्ली पोलिसांनी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या निवासस्थानातून सीसीटीव्ही डीव्हीआर जप्त केला आहे. आप खासदार स्वाती मालीवाल मारहाण प्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणी केजरीवाल यांचे खासगी पीए बिभव कुमार यांना शनिवारी (दि.१९) रात्री पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. मालीवाल मारहाण प्रकरणात दिल्लीचे अतिरिक्त डीसीपी अंजिता चेप्याला, एसएचओ सिव्हिल लाइन्ससह दिल्ली पोलिसांचे एक पथक दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या निवासस्थानी पोहोचले. त्यानंतर त्यांनी येथील सीसीटीव्ही डीव्हीआर ताब्यात घेतला आहे. तसेच प्रिंटर आणि लॅपटॉप देखील उचवलून नेल्याचे समजत आहेत. या प्रकरणात दि.१८ मे रोजी पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज गोळा केले होते. परंतु घटनेच्या वेळेचे फुटेज त्यांना मिळालेले नाहीत. तसेच बिभव तपासात देखील सहकार्य करत नाहीत. त्यामुळेच कारावाई करण्यात आल्याचे दिल्ली पोलिसांनी स्पष्ट केले आहे. मालीवाल मारहाण प्रकरणातील संशयित आरोपी बिभव कुमार यांना शनिवारी (दि.१८ मे) अटक केल्यानंतर न्यायालयात हजर करण्यात आले. दरम्यान, दिल्ली पोलिसांकडून हजर असलेले अतिरिक्त सरकारी वकील अतुल श्रीवास्तव यांनी बिभव कुमारच्या कोठडीबाबत युक्तिवाद केला.

रंजिता पवार यांना शिक्षण क्षेत्रातील प्रतिष्ठीत सीआयआय फाऊंडेशन वुमन एग्झांप्लर अवॉर्ड प्रधान

धाराशिव । प्रतिनिधी

सी. आय .आय फाऊंडेशन हे भारतातील उद्योग जगतातील शिखर संस्था असून त्यांच्यामार्फत शिक्षण क्षेत्रातील प्रतिष्ठीत वुमन एग्झांप्लर अवॉर्ड २०२४ दिनांक १७ मे २०२४ रोजी नवी दिल्ली येथील ताज हॉटेल मध्ये भारताच्या अर्थमंत्री. श्रीमती. निर्मला सीतारामन यांच्या हस्ते व उद्योग जगतातील दिग्गजांच्या उपस्थितीत भव्य समारंभात भारतातील सामाजिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांना सन्मानित करण्यात आले.

हा पुरस्कार ग्रामीण भागातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल व तळागाळातील काम करणा-या महिलांच्या उल्लेखनीय कामाबद्दल गौरव करण्याच्या निमित्ताने देण्यात येतो. ज्या महिलांनी विपरीत परिस्थितीमध्ये गरीबी. सामाजिक अडथळे लिंगभेद यासारख्या अडथळ्यावरती मात करू समाजाच्या बदलासाठी प्रभावी भूमिका बजावली आहे. आशा महिलांना सन्मानित करण्यात येते. त्यामध्ये महाराष्ट्राच्या. रंजिता पवार ज्या उस्मानाबाद जिल्ह्यातील. बंजारा लमाण समुदायातील मुलांचे प्राथमिक शिक्षणात निरंतरता व गुणवत्तावाढवण्याच्या द्रष्टीने कार्य करतात. रंजिता पवार यांनी बंजारा समाजातील हजारो मुलांच्या आयुष्यावर एक सकारात्मक परिणाम निर्माण केले आहे. त्यांनी चे शिक्षण पूर्ण केल्यानंतर मागील १५ वर्षापसून सामाजिक कार्य केले आहे. या कार्याची दखल घेत सी आय फाउंडेशन दिल्ली यांनी रंजिता पवार यांना सन्मानचिन्ह , प्रशस्तीपत्र आणि ३ लाख रोख बक्षीस देऊन. गौरव करण्यात आले . हा पुरस्कार भारताच्या विविध भागातून ३०० हून अधिक नामांकनातून निवडण्यात आले होते. ज्या मध्ये दूरध्वनीवरून मुलाखत, प्रत्यक्ष त्या व्यक्तीच्या कार्यक्षेत्राची भेट, पाहणी या प्रक्रियेतून देशभरातून. १६ अंतिम सदस्याची निवड झाली होती. त्यामध्ये शिक्षण क्षेत्रात रंजिता पवार यांना प्रथम पारितोषिक देण्यात आले. केंद्रीय अर्थमंत्री. निर्मला सीतारामन यांनी नामवंत विजेत्याला पुरस्कार प्रदान केला. कार्यक्रम हा महिलांच्या नेतृत्वाखाली विकासाला चालना देण्यासाठी प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि प्रभावी कार्य करण्यासाठी एक चांगले व्यासपीठ असल्याचे यावेळी माननीय अर्थमंत्री. श्रीमती. निर्मला सीतारामन यांनी प्रतिपादित केले. सदरील पुरस्कार हा. तळागाळातील. समाज परिवर्तना काम करणाऱ्या नेतृत्वशील महिलांना प्रेरणा देणारी ठरू शकते असे, पुरस्कार प्राप्त. रंजिता पवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले.पुरस्कार सोहळ्यास रंजिता पवार च्या कुट्बातील सदस्य उपस्थित होत.

पंतप्रधान मोदींना आम आदमी पक्ष संपवायचा आहे -अरविंद केजरीवाल

नवी दिल्ली । वृतसंस्था

आम आदमी पक्षाच्या वतीने दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यासह सर्व नेते आणि कार्यकर्त्यांनी भाजप कार्यालयाला घेराव घालून धरणे आंदोलन केले. मात्र, दिल्ली पोलिसांकडून परवानगी न मिळाल्याने काही काळानंतर ते माघारी परतले. आंदोलनस्थळावरून परतण्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी आम आदमी पक्षाला संपवण्याचा प्रयत्न करत आहेत, असा आरोप केजरीवाल यांनी केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ऑपरेशन झाडू सुरू केले असून त्यांना आम आदमी पक्ष संपवायचा आहे, असा आरोप यावेळी अरविंद केजरीवाल यांनी केला. अरविंद केजरीवाल आपल्या सहकाऱ्यांसह भाजप मुख्यालयात जाणार होते. मात्र, पोलिसांनी त्यांना मध्येच अडवले, ज्या ठिकाणी त्यांना अडवण्यात आले त्याच ठिकाणी त्यांनी धरणे प्रदर्शन सुरू केले. आम आदमी पक्षाच्या नेत्यांना जाणीवपूर्वक तुरुंगात टाकले जात आहे. त्याचा निषेध करण्यासाठी ते भाजप कार्यालयाकडे येत होते. अरविंद केजरीवाल यांचे स्वीय सहाय्यक विभव कुमार यांना स्वाती मालीवाल मारहाण प्रकरणात अटक करण्यात आली. दरम्यान, पोलिसांनी त्यांना अडवले, यावेळी अरविंद केजरीवाल यांनी भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींवर हल्लाबोल केला. केजरीवाल म्हणाले, ''मिशन झाडू अंतर्गत 'आप' नेत्यांवर कारवाई केली जात आहे. भाजप ऑपरेशन झाडू चालवत आहे. हे सर्व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सूचनेनुसार केले जात आहे, असेही ते म्हणाले. अरविंद केजरीवाल आपल्या सहकाऱ्यांसह रविवारी दुपारी बाराच्या सुमारास आम आदमी पक्षाच्या मुख्यालयातून भाजप मुख्यालयाकडे निघाले.

राधाकृष्ण बाल सुसंस्कार शिबिरातील मुले घेत आहेत आध्यात्मिक आनंद

बीड । प्रतिनिधी

येथील अंबिका चौक येथे हभप भागवताचार्य बबन देव जोशी यांच्या मार्गदर्शनाने उन्हाळ्या च्या सुट्ट्यामध्ये मुलांना मोबाईलच्या व्यसनापासून दूर करण्यासाठी व बालवयातच त्यांच्यावर आध्यात्मिक संस्कार बिंबवावीत या उद्देशाने सुरू केलेल्या अध्यात्मिक बाल सुसंस्कार केंद्रामध्ये जवळपास ५० विद्यार्थी अध्यात्मिक आनंदाचा अनुभव घेत आहेत .

या शिबिरामध्ये परभणी, सेलू, लोणार, घाटसावळी, घोसपुरी, शिरसमार्ग बीड इत्यादी भागातील लहान लहान मुले सहभाग घेऊन या शिबिरामध्ये पेटी वादन ,गायन हरिपाठ तसेच पावल्या खेळने याबरोबरच गीतेचे पठण करणे इत्यादी विषय मुलांना शिकवले जात आहेत आणि या शिक्षणाबरोबरच बालवयामध्ये ही मुल मुली आध्यात्मिक आनंद घेत आहेत. या शिबिरामध्ये संगीत, गायन, वादन, पठण याबरोबरच लहान मुलांना अध्यात्मिक ज्ञान मिळत आहे याचा मुलाबरोबरच त्यांच्या पालकांना देखील खूप आनंद व समाधान मिळत आहे असे या बालसंस्कार केंद्राचे बबन देवा जोशी यांनी सांगितले. राधा कृष्ण अध्यात्मिक वारकरी बाल संस्कार शिबिर म्हणजे आनंदाची पर्वणी होय या आनंदाच्या पर्वणीमध्ये असंख्य बाल गोपाळ अगदी आरमान होऊन गेले आहेत व उन्हाळी सुट्टीचा आनंद घेत आहेत.

पान १वरून...

शेतकऱ्यांच्या एफआरपीवर

कारखान्यांनी उसापासून इथेनॉल निर्मीती करण्यास प्राधान्य दिले आहे. ज्यामुळे साखर, इथेनॉल, बगॅस, को -जन, स्पिरीट, अल्कोहोल, मळी यासह इतर उपपदार्थांना चांगला दर मिळाला आहे. यामुळे साखर कारखान्यांकडे उत्पादन खर्च वजा जाता पैसे शिल्लक राहू लागले आहेत. राज्यातील काही कारखान्यांनी शेतकऱ्यांना सर्व थकबाकी चुकती केली आहे. मात्र, काही कारखान्यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेत ठराव पारित झाला नसल्याचे कारण दिले आहे. ज्यामुळे संबंधित कारखान्यांच्या शेतकऱ्यांना संपूर्णतः उसाची थकबाकी मिळू शकलेली नाही, असेही राजू शेट्टी यांनी म्हटले आहे.

परळी मतदार संघ ठरवणार

अंदाज असून मारवाडी आणि ब्राम्हण समाजाचे जवळपास ११२०० असे मतदान झाल्याचा अंदाज आहे. वंजारी, ओबीसी आणि ब्राम्हण, मारवाडी यांचे मतदान हे पंकजा मुंडे यांना झाले असावे, तर मराठा आणि मुस्लिम मतदारांचा कल हा पुर्णत: बजरंग सोनवणे यांच्या बाजूने होता. गेवराईत मराठा आणि मुस्लिम समाजाचे मतदान हे सर्वाधिक झाले असावे. त्यापाठोपाठ वंजारी आणि ओबीसींचे मतदान झाल्याचा अंदाज असून या मतदार संघात वंजारी समाजाची मतदार संख्या कमी असल्याने या गेवराईतून बजरंग सोनवणे यांना २० ते २५ हजाराचे मताधिक्य मिळेल, असा अंदाज आहे. तर आष्टी मतदार संघात महायुतीकडे आ. सुरेश धस, आ. बाळासाहेब आजबे आणि माजी आ. भीमराव धोंडे हे तीन दिग्गज नेते आहेत. त्याशिवाय या मतदार संघात मराठा समाजाच्या आसपास वंजारी समाजाची मतदार संख्या आहे. तसेच माळी समाजाची मतदार संख्या ही या मतदार संघात २५ ते ३० हजार असल्याने येथे पंकजा मुंडे यांचे पारडे जड असल्याचे म्हटले जात आहे. त्यामुळे त्यांना ३० ते ३५ हजार मतांची लिड मिळण्याचा अंदाज आहे. केज हे बजरंग सोनवणे यांचे होमपिच आहे. त्यामुळे तेथून त्यांना ५ ते १० हजाराचे मताधिक्य मिळेल, असे म्हटले जात आहे. मात्र २००९ पासून केजने भाजपला आघाडी दिलेली आहे. त्यामुळे ५ हजारापर्यंत का होईना पंकजा मुंडे यांनाच मताधिक्य मिळेल, असे म्हटले जात आहे. माजलगाव तालुका हा आतापर्यंत भाजपला मताधिक्य देणारा ठरला आहे. मात्र यावेळी परिस्थिती वेगळी आहे. माजलगाव तालुक्यातून बजरंग सोनवणे यांना मताधिक्य मिळेल, पण धारूर आणि वडवणी तालुके ती लिड कमी करतील, असे म्हटले जात आहे. त्यामुळे माजलगाव मतदार संघातून सोनवणे यांना मताधिक्य मिळाले तरी ५- १० हजाराचेच मिळेल, असा अंदाज आहे. परळी मतदार संघा हा मुंडे बहिण -भावाचा बालेकिल्ला आहे. धनंजय मुंडे यांनी कृषीमंत्री व त्या अगोदर सामाजिक मंत्री, बीडचे पालकमंत्री असताना मतदारसंघात सर्व जातीधर्माच्या लोकांसाठी काम केले. ते काम आता पंकजाताई यांच्या कामी आले आहे. त्यांना सर्वच जातीधर्माच्या लोकांनी मतदान केल्याचे म्हटले जात असून तेथून ७० ते एक लाखापर्यंत मताधिक्य मिळेल, असा अंदाज आहे. त्यामुळे परळी मतदार संघच बीडचा खासदार कोण होणार हे ठरवणार असल्याचे दिसते. तर धनंजय मुंडे हे किंगमेकर ठरणार असून सुरुवातीपासूनच सावलीप्रमाणे बहिण पंकजासाठी त्यांनी जीवाचे रान केले आहे. त्यामुळे खरे किंगमेकर तेच ठरणार असल्याचेही म्हटले जात आहे. परळी परळी आणि आष्टी हे दोन मतदार संघ पंकजाताई मुंडे यांना तर गेवराई आणि बीड हे बजरंग सोनवणे यांच्यासाठी फायदेशिर ठरतील, असे दिसते. एकंदरीत विजय कोणाचाही झाला तरी तो २० ते ३० हजाराच्या आसपास असणार आहे.

तलवारीने केक कापणे

मोगरा येथे ही घटना घडली. अतुल किशन पांढरपोटे या माजलगाव तालुक्यातील मोगरा येथील तरुणाचा दोन दिवसांपूर्वी वाढदिवस होता. वाढदिवसाच्या निमित्ताने त्याने मित्रांसह केक कापून वाढदिवस साजरा केला. मात्र, केक कापण्यासाठी त्याने तलवारीचा वापर केला. याबाबतचा फोटो व व्हिडिओ सोशल मीडियावरही टाकला. यानंतर दिंद्रुड पोलिस ठाण्याचे पोलिस कर्मचारी श्रीडोळे यांनी दिलेल्या तक्रारीवरून अतुल किशन पांढरपोटे, महादेव पांढरपोटे, अभिषेक पांढरपोटे, नागेश पांढरपोटे, भैय्या पांढरपोटे आणि ज्ञानेश्वर पांढरपोटे (सर्व रा. मोगरा, ता. माजलगाव) यांच्याविरोधात दिंद्रुड पोलिस ठाण्यात गुन्हा नंबर ९४/२०२४ कलम ४/२५ आर्मी ॲक्ट प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीने गुन्ह्यात वापरलेले हत्यार जप्त केले असून आरोपीस अटक करण्यात आल्याची माहिती मिळाली आहे.

अन् नात्याला पाझर

आश्रमात पोहोचवण्याची व्यवस्था केली आहे. दरम्यान आई-वडिलांच्या बेबनाव ताटातुटीत तीन चिमुकल्यांची मोठी तारांबळ होत आहे. गेवराई तालुक्यातील बोरी पिंपळगाव येथील ज्ञानेश्वर जाधव यांचा माजलगाव तालुक्यातील पुंगनी येथील महिलेसोबत विवाह झाला होता. दरम्यानच्या काळात त्यांना आर्यन (वय ६ वर्षे) अनिकेत (४ वर्षे) व आराध्या (२ वर्ष) अशी तीन मुले झाली. उभयतांत काही दिवसापूर्वी वाद झाल्याची गावकऱ्यात चर्चा आहे.यामुळे मुलांचे वडील ज्ञानेश्वर मोठ्या शहरात वास्तवास गेले,तर आईने लेकरांना नातेवाईकाच्या हवाली सोडून माहेर जवळ केले.दरम्यान काही दिवस नातेवाईकांनी मुलांना सांभाळले. परंतु आईबाप तिकडं मजा करत आहेत.आम्ही ही प्याद का सांभाळायची? अशा भावनेने नातेवाईकांनी या तीन चिमुकल्यांना त्यांच्या आईचे गाव असणाऱ्या माजलगाव तालुक्यातील पुंगनी गावच्या पुलावर सोडून दिले.ही बाब गावकऱ्यांच्या लक्षात येताच त्यांनी माजलगाव पोलिसांना याची माहिती दिली. दरम्यान पोलिसांनी मुलांना ताब्यात घेऊन बीडच्या बाल आश्रमात त्यांना पोहोचण्याची व्यवस्था केली आहे. या कामी पोलीस पोलीस उपनिरीक्षक ऐटवाड, पोलीस कर्मचारी चव्हाण मॅडम,कापले मॅडम यांनी मदत केली.

विकृत मानसिकतेतून

दरम्यान कॉलनी मध्ये असलेल्या सोहम गॅस दुकानात शिरून दुकानातील गल्ल्या मधील नगदी २७ हजार रू ज्यामध्ये ५०० रू दराच्या ५४ नोटा आरोपीने शिवीगाळ करून चापटबुक्क्यांनी मारहाण करत शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली व दुकानातील गॅसभटटी फेकुन देवुन सामानाचे नुकसान केले. ७२४ नुसार गुन्हा दाखल झाला असून ६या प्रकरणी संभाजी नगर पोलीस अधिक तपास करत आहेत.

आनंदाची बातमी! दक्षिण अंदमानच्या

तसेच देशात यंदा पावसासाठी हवामान परिस्थिती अनुकूल असल्याचे म्हटले होते. तर ३१ मे पर्यंत मान्सून दाखल होईल असेही म्हटले होते. यामुळे आता देशात १ जूनला दाखल होणारा मान्सून एक दिवसा आधीच दाखल होण्याची शक्यता आहे. रविवारी निकोबार बेटे आणि दक्षिण अंदमानच्या समुद्रात मान्सूनचा पाऊस पडला. यामुळे राज्यासह देशात मान्सूनच्या आगमनाची उत्सुकता सर्वसामान्यांसह शेतकऱ्यांना लागली आहे. तर हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार ६ जूनपर्यंत तळ कोकणात आणि ७ जून पर्यंत पुण्यात दाखल होण्याची शक्यता आहे.

चिपळूणच्या अडरे गावात ढगफुटी

यादरम्यान चिपळूणच्या अडरे गावात ढगफुटी सदृष्य पाऊस झाल्याने रेकॉर्डब्रेक पाऊसाची नोंद झाली आहे. येथील अडरे गावच्या अनारी भागात फक्त अर्ध्या तासात झालेल्या पावसाने नद्यांमधील पाणी पातळीत वाढ झाली आहे. याचा व्हिडीओ समोर आला असून अडरे गावच्या अनारी भागातून जाणारी नदी दुथडी भरुन वाहत आहे. तर मुसळधार पावसामुळे पुलाचे काम करण्यासाठी आणलेले साहित्य वाहून गेले आहे.

जूनमधील शैक्षणिक प्रवेशापूर्वी

भविष्यासाठी उपोषणाचा निर्णय घेतला आहे. यामुळे उपोषणाला राज्यातील घराघरातील मराठा समाज अंतरवाली सराटीत असेल. मी राजकारणात येण्यात इच्छुक नाही. मात्र सगे सोयऱ्याची अंमलबजावणी व मराठा कुणबी एक असल्याचा कायदा केला नाही, तर समाजाला सत्तेत घालून निवडणूक लढवावी लागेल असेही जरांगे म्हणाले. तसेच लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात देखील मराठा समाजाने ताकदीने मतदान करा. मराठा समाजाने लेकरं डोळ्यासमोर ठेवून निवडणुकीत मतदान करा. नाशिकच्या उमेदवाराला माझा पाठिंबा नाही. माझा कोणालाच पाठिंबा नाही, असेही जरांगे म्हणाले.

कार्यकर्त्यांमुळेच बहिण - भाऊ अडचणीत

मुंडे बंधू भगिनी चर्चेला आले तर चर्चा करणार का ? यावर जरांगे म्हणाले, वंजारी आणि मराठ्यांचे कधीच काही झाले नाही. निवडणुकीत अनेक मराठे त्यांच्या बाजूने उभा राहिलेत मराठे त्यांच्या विरोधात नाहीत. मात्र त्यांचे कार्यकर्ते आक्रमक भूमिका घेतात. मग त्याची फळे त्यांच्या मोठ्या नेत्यांना भोगावे लागतात. जरांगे म्हणाले, ते मुद्दामहून करत आहेत. त्यांचेच लोक त्यांनाच पाडणार आहेत आणि ते आपले नाव घेतील. त्यामुळे तुम्ही उपोषणाच्या तयारीला लागा. तसेच शांत रहा, फक्त काय काय घडतेय यावर बारकाईने लक्ष ठेवा, असे जरांगे म्हणाले.

बांधकामाच्या नावाखाली वैद्यनाथ

प्रशासकीय पातळीवर तसेच मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या माध्यमातून प्रभू वैद्यनाथाच्या विकास आराखड्यास मंजुरी मिळाली. यास प्रशासकीय मान्यता मिळून प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. दरम्यान विकास आराखड्यामुळे निर्माण होणाऱ्या सोईसुविधांमुळे शहरात पर्यटक व भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. यामुळे परिसरातील व शहरातील नागरीकांना रोजगाराचे साधन उपलब्ध होणार आहे. दरम्यान ५ डिसेंबर २३ मध्ये झालेल्या शासन आपल्या दारी कार्यक्रमाच वैद्यनाथ मंदिराच्या विकास आराखड्याचे भूमिपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, धनंजय मुंडे, पंकजा मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले होते. यानंतर मंदिराच्या पूर्व भागात भाविकांच्या दर्शनासाठी सभामंडप बांधण्यात सुरुवात करण्यात आली आहे. या बाजूला मंदिराच्या जुन्या भव्य पायऱ्या आहेत. त्याच बाजूला प्रति वैद्यनाथाचे मंदिर आहे परळीकर याचे नित्य नेमाने दर्शन घेत असतात. या पूर्व भागातील अर्ध्या पायऱ्या तोडून बांधकामासाठी रस्ता तयार करण्यात आला आहे. यामुळे मंदगराची पुरातन ओळख पुसली जाईल. कारण बांधकाम सुरू होण्या अगोदर मंदिराची पुरातन ओळख जोपासूनच बांधकाम करण्यात येईल असे सांगण्यात आले होते. मग काम सुरू होतानाच या पायऱ्या का तोडण्यात आल्या. पायऱ्या तोडून मंदिराचा विकास नको कारण ही पुरातन ओळख जोपासूनच काम करावे व गुत्तेदारावर कारवाई करावी अशी मागणी परळीकरांनी केली आहे.

आरक्षणाची मर्यादा

फक्त तामिळनाडूचा आरक्षण कायदा भारतीय राज्यघटनेच्या ९ व्या अनुसूचीमध्ये समाविष्ट आहे. तामिळनाडूमध्ये ६९ टक्के आरक्षण आहे, परंतु ते असंवैधानिक नाही. आम्ही म्हणतो की आम्ही आरक्षणाची मर्यादा वाढवू. पण, माझा सरकारला सवाल आहे की, तुम्ही आरक्षणाची मर्यादा वाढवणार का? जात जनगणना करणार का? असा सवाल त्यांनी यावेळी केली.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि. २० मे २०२४

बीड : शिवसंग्राम बीड शहर अध्यक्षपदी सुहास पाटील यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करतांना पाटोदा नगर पंचायत अध्यक्ष श्री राजू भैय्या जाधव व त्यांचे सहकारी

सौंदाना गावात कापूस जळून साडेतीन लाख रुपयांचे नुकसान

शॉर्टसर्कीटमुळे लागली कापसाला आग

बीड । प्रतिनिधी

रविवार रोजी सध्या बीड तालुक्यात सौंदाना गावात पाण्याची भीषण टंचाई निर्माण झालेली आहे एवढी दुष्काळी परिस्थिती असताना शासनाच्या निष्काळजीपणामुळे शेतकऱ्यांच्या मालाला भाव नसल्यामुळे बीड तालुक्यातील प्रत्येक गावात भाव नसल्यामुळे कापूस घरात पडून आहेत तसेच सौंदाना ता.जि.बीड येथे सौ मिनाबाई अशोक गायके यांच्या घरी भागवत हा धार्मिक कार्यक्रम दरवर्षीप्रमाणे याही वर्षी चालू होता यातच सकाळी दहाच्या सुमारास घरामध्ये २५ ते ३० क्विंटल कापूस असताना अचानक शॉर्ट सर्टिफिकेट मुळे कापसाला आग लागली यातच तीन ते साडेतीन लाख रुपयांचे नुकसान झाले यावेळी गावातील तरुण मुलांनी धाव घेतली आणि कापूस विजवण्याचा प्रयत्न केला पण अगोदरच सर्व कापूस जळून खाक झाला होता यामुळे सौ मीनाबाई अशोक गायके या शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले आहे तरी या कुटुंबाला शासनाने मदत करावी अशी मागणी गावातील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री राजू गायके व युवा कार्यकर्ते श्री प्रवीण कथले व अशोक मामा घोलप यांनी केली आहे. तरी याचा पंचनामा कुमसी सज्जाचे व सौंदाना गावाचे तलाठी सौ स्वाती घुगे मॅडम यांनी पंचनामा केला यावेळी गावातील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री राजू गायके तसेच प्रवीण कथले युवा कार्यकर्ते तसेच भाजपाचे तालुका अध्यक्ष अशोक मामा घोलप गावातील प्रतिष्ठित व्यक्ती यांनी वेळीच दखल घेऊन पंचनामा करताना हजर होते

सामाजिक शांतता राखण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे -माजी आमदार साहेबराव दरेकर

आष्टी (प्रतिनिध)

लोकसभा निवडणूक पार पडली असून काही दिवसांनी निवडणुकीचा निकाल लागेल परंतु दरम्यानच्या काळात प्रचार अपप्रचार झाला गावागावातील सामाजिक वातावरण बहुसंख्यांक विरुद्ध अल्पसंख्यांक असे झाले असून मोबाईल वरून तरुण पिढी एकमेकांना वाईट संदेश पाठवत आहेत ते समाजाला घातक आहेत त्यामुळे सर्व समाजातील प्रतिष्ठित मंडळींनी गावोगावी बैठक घेऊन सामाजिक शांतता राखण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन आष्टी,पाटोदा शिरूर का. विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते साहेबराव दरेकर यांनी एका प्रसिद्धी पत्रकारद्वारे केले

आहे.

या पत्रकात ते म्हणतात लोकसभा निवडणूक पार पडली असून यापुढे लवकरच पुन्हा विधानसभेच्या आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येऊ घातलेल्या आहेत. त्यामुळे सामाजिक वातावरण दूषित होऊन चालणार नाही. राजकीय प्रचार वेगळा आणि दैनंदिन व्यवहार वेगळा आता लोकसभा निवडणुकीचा प्रचार संपला आहे. पुढील निवडणूक येईपर्यंत सामाजिक सलोखा राखण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी सर्व राजकीय पक्षाच्या सर्व नेत्यांनी एकत्रित बसून आपापल्या कार्यकर्त्यांना समाजाच्या हिताच्या चार गोष्टी सांगण्याची आवश्यकता आहे. लवकरच विधानसभा निवडणुका असल्यामुळे सर्व जाती धर्मांना एकमेकांशी संबंध ठेवावेच लागणार आहेत.सर्व राजकीय पक्षांना आपापले मतदार सांभाळायचे असल्यामुळे सर्वांनी मिळून प्रयत्न करून सामाजिक सौख्य राखण्याचा प्रयत्न केला पाहिजे असेही माजी आ.साहेबराव दरेकर यांनी आवाहन केले आहे.

सरवर पिंपळगाव, अडोळा या ठिकाणी माती परवाना देणेच भौगोलिक दृष्ट्या धोकादायक

माजलगाव । प्रतिनिधी

गोदावरी नदीकाठी असलेल्या सोमठाणा,सरवर पिंपळगाव आणि आडोळा या शिवारातील माती परवाना देणे भौगोलिकदृष्ट्या अति धोक्याचे ठरू शकते कारण हे तिन्ही गावे नदीकाठी असल्याने मोठ्या प्रमाणात

माती उकरुन नेल्यामुळे नदीकाठाची मोठ्या प्रमाणात झीज होत आहे. यामुळे येणाऱ्या नैसर्गिक आपत्ती पूरामुळे गावात पाणी घुसून आर्थिक व जीवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याचप्रमाणे लाखो रुपयाचा निधी खर्च करून सामाजिक रस्ते बांधकाम विभागातर्फे विविध योजनेअंतर्गत काही महिन्यापूर्वीच सरवर पिंपळगाव व अडोळा येथे डांबरी रस्ते करण्यात आलेली आहेत. परंतु अवजड माती वाहनांच्या दळणवळणामुळे रस्ते उखडल्या गेले आहेत. रस्त्यावरील छोट्या छोट्या पुलावर मोठे भगदाड पडत आहेत. प्रशासकीय बाबीचा विचार केला तर लोकांच्या जीवापेक्षा शासनासाठी महसूल मोठा नाही.म्हणून येत्या काळात सदरील ठिकाणी माती रेती, साठी महसूल परवाने न देता सर्वसामान्यांच्या जीवाचा विचार करून निर्णय घेण्यात यावा. ही नम्र विनंती गावकऱ्यांच्या वतीने करत आहे. या मातीचा उपयोग फक्त आणि फक्त वीट भट्ट्यासाठी होतो. याकडेही लक्ष असावे.आपला एक चुकीचा निर्णय तिन्ही गावातील हजारो गावकऱ्यांच्या जीवावर उठू शकतो.

प्रा.सुरेश नवले मित्र मंडळाच्या वतीने आज वन्यप्राण्यांसाठी उभारणार पाणवठे

बीड । प्रतिनिधी

प्रा.सुरेश नवले मित्र मंडळाच्या वतीने बीड तालुक्यातील बालाघाट डोंगररांगेत ठिकठिकाणी जलप्याऊ कट्टे अर्थात वन्य प्राण्यांसाठी पानवठे उभारणी केली जाणार आहे. बालाघाटावरील कार्यकर्ते बाळासाहेब मोरे यांनी याबाबत प्रा. सुरेश नवले यांच्याकडे गेल्या काही दिवसांपूर्वी मागणी केली होती. त्यांच्या मागणीला प्रतिसाद देत प्रा. सुरेश नवले नवले यांनी वन्य प्राण्यांसाठी पानवठे उभारणीसाठी स्वतःहून पुढाकार घेत प्रा सुरेश नवले मित्र मंडळाच्या वतीने शेकडो पानवठे उपलब्ध करून दिले आहेत. या पानवठे उभारणीचा शुभारंभ आज दि. २० मे रोजी सकाळी दहा वाजता श्रीक्षेत्र तपोवन मोरेश्वर संस्थान कोळवाडी येथील ह.भ.प. तुलसीदास महाराज शिंदे यांच्या हस्ते केला जाणार आहे.

तीव्र उन्हाळ्यामुळे पाण्याच्या शोधार्थ अनेक वन्य प्राण्यांना राष्ट्रीय महामार्ग ओलांडताना अनेकदा जीव गमवावा लागत असल्याच्या काही घटना घडलेल्या आहेत, त्यामुळेच वन्य प्राणी व पशु पक्षांसाठी सामाजिक भावनेतून प्रा. सुरेश नवले मित्र मंडळाच्या वतीने बालाघाट डोंगररांगेतील मांजरसुंबा, कपिलधारवाडी, मोरदरा, कोळवाडी, आणि बालाघाट डोंगर परिसरात ठिकठिकाणी जलप्याऊ कट्टे अर्थात पानवठे उभारणी केली जाणार आहे. याचा शुभारंभ आज दि.२० मे रोजी सकाळी १० वाजून ५ मिनिटांनी ह.भ.प. तुलसीदास महाराज शिंदे यांच्या हस्ते केला जाणार आहे. याप्रसंगी ऍड. चंद्रकांत नवले, सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, शिवाजीराव जाधव, श्रीमंत उबाळे,ललित अब्बड आदींची उपस्थिती राहणार आहे. याप्रसंगी उपस्थित राहावे असे आवाहन बाळासाहेब मोरे, यांच्यासह संभाजी कदम, महादेव नाईकवाडे, बाबुराव येडे पाटील, काकासाहेब शिंदे, शहादेव कदम, रुद्र महाकले, भास्कर वाणी पाटील, यांनी केले आहे.

चातुर्मास उत्सवानिमित्त बीडच्या तीन जैन साध्वी महाराजांचे बीडमध्ये आगमन

बीड । प्रतिनिधी

यंदाचा सोलापूर नगरीत जैन समाज बांधवांचा बऱ्याच दिवसाची मागणी लक्षात घेऊन यावर्षी सोलापूर नगरीतील जैन बांधवांना चातुर्मास मिळाला आणि मोठ्या उत्साहाने चातुर्मास आयोजित करणार आहेत. या चातुर्मासासाठी छत्रपती संभाजीनगर येथून सोलापूरकडे पायी मार्गस्थ झालेल्या चार जैन साध्वी महाराजांचे आज (दि.१९) रोजी सकाळी ६ वाजता गेवराई मार्गेवर रतन फार्म हाऊस येथून बीड शहरात आगमन होणार आहे.महालक्ष्मी चौकातून रतन फार्म हाऊस ते बीड शहरात आगमन करणार आहेत, फुलाई नगर येथे संजय नहार यांच्याकडे आगमन होऊन एक दिवस वास्तव्य राहणार आहे.

प.पू. गुरुदेव श्री.गणेशलालजी म.सा एवं गुरणीसा प. पू. प्रभाकंवरजी म सा, प.पू. किरणसुधाजी म.सा.की सुशिष्या स्वाध्याय प्रेमी प.पू. प्रज्ञाजी म.सा. प्रवचन प्रभाविका प.पू. प्राचीश्रीजी म.सा. (साभद्रां. बीड) मधुर वक्ता प.पू. प्रसन्नाजी म. सा. (श्रीश्रीमाळ.बीड) जिनशासन प्रभाविका प.पू. प्राप्तिश्रीजी म. सा (आब्बड.बीड) आदी ४ ठाणा यांचे आज दिनांक १९ मे रोजी सकाळी ६ वाजता बीड शहरात आगमन होणार आहे. महाराजांच्या सोयी नुसार बीड शहरातील जैन स्थानक श्री. वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ. महावीर चौक, शनिवार पेठ येथे आगमन होणार आहे. त्यानंतर त्यांच्या सोयीनुसार ते बीड हुन पाली, मांजर सुंबा, चौसाळा, पारगाव मार्गे सोलापूर येथे मार्गस्थ रवाना होणार आहेत. त्यांच्या चातुर्मासनिमित्त खूप मोठा उत्साह असून बीडच्या तीन जैन साध्वी महाराजांचे विचार ऐकण्यासाठी तसेच जैन शास्त्राविषयी, जैनसूत्र विषय अभ्यास याचा मोठा लाभ होणार आहे आणि सोलापूर नगरीतील समाज बांधव ही आग्रही आहेत. यावेळी त्यांचे दर्शन घेण्यासाठी बीडचे समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होणार आहेत. असे सकल जैन समाजाचे ज्येष्ठ श्रावक, मोतीलाल संचेती, कैलासजी तातेड, संपतजी कोटेचा, संपतजी धोका, रमेशजी लोढा सकल जैन समाजाचे युवा अशोक लोढा, राजेश बंब, पारस संचेती, उज्वल कोटेचा, सतीश कोटेचा, मदन दुग्गड, रमेश पगारिया, डॉक्टर मनोज ओस्तवाल, संजय कोटेचा, महेंद्र दुग्गड, राजेश बोरा, जितेंद्र कोटेचा, तुषार बरलोटा, महावीर बोरा, आशिष संचेती, अक्षय बाफना, वृषभ बाफना, सुशील खिवांसरा, संतोष बोथरा, सचिन बोथरा, सुशील कोटेचा, गौरव छल्लाणी, अमित सांबरे, अजित सांबरे, सुमित सांबरे, अभय बोरा, दीपक आब्बड, संकेत नहार, प्रतीक बाफना, वृषभ नहार, ललित आब्बड, प्रफुल आब्बड अरिहंत नेहरू युवा वतीने सांगण्यात आले आहे की जैन साध्वी महाराजाचे दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन सकल जैन समाज वतीने करण्यात आले.

प्रदीप कुलकर्णी यांनी साहित्यात उच्चांक गाठला- स्नेहल पाठक

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगावात साहित्य चळवळ आहे, साहित्यिक ही भरपुर आहेत. अनेकांचे लिखाण खुप सुंदर आहे. हे सगळे असले तरी प्रदीप कुलकर्णी यांनी 'प्रेमात पडायचे होते पण' ही कादंबरी प्रकाशीत करुन माजलगाव च्या साहित्य चळवळीत उच्चांक गाठला आहे. यामुळे त्यांचे खरच कौतुक करावे तेवढे कमीच आहे अशा शब्दात प्रदीप कुलकर्णी यांच्या बद्दलच्या भावना प्रेमात पडायचे होते पण या कादंबरीच्या प्रकाशन सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून बोलतांना प्रा.स्नेहल ताई पाठक यांनी व्यक्त केल्या.

श्री मंगलनाथ मल्टीस्टेटच्या सभागृहात प्रदीप कुलकर्णी लिखीत प्रेमात पडायचे होते पण या कादंबरीचा प्रकाशन सोहळा अत्यंत आनंदात आणि उत्साही वातावरणात दि. १८ मे २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजता संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचे अध्यक्ष आर.जी.कानडे हे होते.

प्रारभी मान्यवरांच्या हस्ते विद्येची देवता सरस्वती देवीचे पुजन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांचा सत्कार भगवंत हावरगावकर, सौ. भाग्यश्री हावरगावकर, सौ. आनंदी कुलकर्णी, रविंद्र सोनवळकर यांच्या हस्ते करण्यात आला. लेखक प्रदीप कुलकर्णी यांचा मंगलनाथ परिवाराच्या वतीने भव्य दिव्य असा सत्कार करुन त्यांना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.या वेळी ॲड. रविंद्र कानडे, ॲड. सुनिल सौंदरमल, पत्रकार बालासाहेब फपाळ, कवि प्रकाश पत्की, भिमराव होके यांनी आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवींद्र सोनवलकर यांनी केले. कार्यक्रमाचे शेवटी शाश्वती अर्बन चे चेअरमन नंदकुमार हावरगावकर यांनी आभार मानले.कार्यक्रमास माजलगाव शहरातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यात वकील साहित्यिक, पत्रकार, वाचक यांच्यासह श्री मंगलनाथ मल्टीस्टेट च्या कर्मचाऱ्यांचा समावेश होता.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री मंगलनाथ मल्टीस्टेटच्या अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

बलात्कार केल्याच्या आरोपातून आरोपीला जामीन मंजूर

बीड । प्रतिनिधी

रुद्रापूर ता.जि.बीड येथे दि.२१ एप्रिल २०२४ रोजी एका महिलेवर बलात्कार झाल्याप्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरुन बीड ग्रामीण पोलीस ठाणे येथे बलात्कार केल्याचा गुन्हा नोंद झाला होता आरोपीस पोलीसांनी अटक करुन मा.न्यायालय बीड येथे हजर केले असता त्यास न्यायालयाने पोलीस कोठडी व त्यानंतर न्यायालयीन कोठडी दिली होती त्यानंतर आरोपीच्या वतीने ॲड.शेख ईमरान खाजा यांनी बीड येथील मा.सत्र न्यायालयात फौजदारी जामीन अर्ज दाखल केला असता त्यास न्यायालयाने जामीन मंजुर केला.

याबाबत माहिती अशी की, बीड जवळील मौजे रुद्रापुर येथे दि.२१ एप्रिल २०२४ रोजी एका महिलेवर बलात्कार झाल्याची फिर्यादी ग्रामीण पोलीस स्टेशन येथे दि.२३ एप्रिल २०२४ रोजी फिर्यादीकडून देण्यात आली होती. यावेळी आरोपी नामे संजय पवार यास पोलीसांनी भारतीय दंड संहितेनुसार कलम ३५४-ड, ३७६, ४५२, ३२३, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा क्रमांक १४२/२०२४ असा दाखल करत अटक करुन मा.न्यायालयासमक्ष हजर केले असता त्यास पोलीस कोठडी सुनावण्यात आली व त्यानंतर आरोपीची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली होती. सदर प्रकरणात आरोपी याने मा. सत्र न्यायालय बीड येथे जामीन मिळणेकामी जामीन अर्ज ॲड.शेख ईमरान खाजा यांच्या मार्फत दाखल केला. सदर प्रकरणात ॲड.शेख ईमरान यांनी मा.न्यायालयासमोर कायदेशीर बाबी मांडल्या व त्या ग्राह्य धरुन मा.न्यायालयाने आरोपीचा जामीन अर्ज योग्य त्या अटी व शर्तीवर मंजूर केला. या प्रकरणात आरोपीच्या वतीने ॲड.शेख ईमरान खाजा यांनी न्यायालयीन कामकाज पाहिले त्यांना ॲड.सुर्यकांत पवार, ॲड.पंकज रायभोळे, ॲड.अन्वर शेख यांनी सहकार्य केले.

नर्सिंगच्या नवीन अभ्यासक्रमामुळे संधी वाढल्या

रमा गिरी यांचे प्रतिपादन; माऊली नर्सिंगमध्ये शपथग्रहण सोहळा

बीड । प्रतिनिधी

नर्सिंग क्षेत्रामध्ये करिअरच्या संधी मोठ्या प्रमाणात आहेत. आता नवीन अभ्यासक्रमामुळे हा अभ्यासक्रम पूर्ण करणारे विद्यार्थी परदेशातही सक्षमपणे रुग्णसेवा करु शकतात असे प्रतिपादन जिल्हा रुग्णालयाच्या मेट्रन रमा गिरी यांनी केले.

बीड शहरातील धानोरा रोडवर असलेल्या माऊली नर्सिंग कॉलेजमध्ये विद्यार्थीनींचा शपथग्रहण सोहळा आयोजीत करण्यात आला होता. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून गिरी बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर डॉ.अजय विघ्ने, डॉ.वर्षा तिडके, रंजना मॅडम, संस्थेचे सचिव डॉ.महादेव मुंडे, प्रा.संगीता मुंडे, दत्तात्रय चोले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी दिपप्रज्वलन करुन फलोरेन्स नाईटींगेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यानंतर

विद्यार्थीनींना शपथ देण्यात आली. यावेळी बोलतांना रमा गिरी म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी नर्सिंग क्षेत्रात करिअर करतांना समर्पण भावना ठेवणे आवश्यक आहे. या क्षेत्रात तुम्हाला तुमच्या करिअरबरोबरच रुग्णसेवेलाही तेव्हढेच महत्त्व द्यावे लागणार आहे. आज विविध क्षेत्रात मोठी स्पर्धा निर्माण झाली आहे. नर्सिंग क्षेत्रही याला अपवाद नाही. असे असतांनाही आरोग्यविषयक विविध सेवांमध्ये हा अभ्यासक्रम पूर्ण करणार्या विद्यार्थ्यांना संधी मिळू शकते. यातही आता नवीन अभ्यासक्रमामुळे विद्यार्थी परदेशातही चांगल्या पद्धतीने सेवा देऊ शकतात असे गिरी यांनी सांगितले. यावेळी डॉ.अजय विघ्ने, डॉ.वर्षा तिडके, डॉ.महादेव मुंडे, प्रा.संगीता मुंडे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य पोपळे, धनंजय मेडकर सर, शुभम जोगदंड, किरण वडमारे मॅडम, आदिंसह विद्यार्थी-विद्यार्थीनींची उपस्थिती होती.

आलेक रेदासनी सीबीएसई परिक्षेत तालुक्यात अव्वल

माजलगाव । प्रतिनिधी

येथील सिंदफना पब्लिक स्कुलचा विद्यार्थी आलेक प्रमोद रेदासनी हा सीबीएसई १० वीच्या परिक्षेत ९८% गुण मिळवून शाळेतून तसेच तालुक्यातून सर्वप्रथम आला आहे. त्याने हे यश कोणत्याही शिकवणी शिवाय स्वयं अध्ययनाच्या बळावर मिळविले आहे. सातत्याने अभ्यास, जिद्द, चिकाटीने मिळविलेल्या त्याच्या या यशाचे सर्वत्र कौतूक होत आहे. त्याच्या या यशात त्याच्या सर्व कुटुंबीयां समवेत शाळेचे प्राचार्य तसेच त्याच्या सर्व शिक्षकांचा वाटा आहे असे त्याने सांगितले.

पीएम किसानचा १७ वा हप्ता मिळण्यापुर्वी होणार मुल्यमापण

» केंद्र सरकारनं घेतला हा महत्वचा निर्णय

मुंबई: केंद्र सरकारनं शेतकऱ्यांसाठी सामान्य नागरिकांसाठी विविध योजना सुरु केल्या आहेत. शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ मिळावं हाच यामागचा उद्देश आहे. अशीच एक योजना म्हणजे पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना या योजनेच्या माध्यमातून सरकार दरवर्षी शेतकऱ्यांना ६००० रुपयांचे आर्थिक पाठबळ देते. आत्तापर्यंत १६ हप्ते शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले आहेत. दरम्यान, १७ वा हप्ता शेतकऱ्यांना मिळण्यापूर्वी मोठी अपडेट समोर आली आहे.

केंद्र सरकार योजनेचे मूल्यमापन करणार

देशातील शेतकऱ्यांना पंतप्रधान किसान सन्मान निधीचे आत्तापर्यंत १६ हप्ते मिळाले आहेत. १७ वा हप्ता कधी मिळणार याची प्रतिक्षा लागली आहे. हा १७ वा हप्ता शेतकऱ्यांना लवकरच मिळणार असल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान, पंतप्रधान किसान सन्मान निधीचा १७ वा हप्ता शेतकऱ्यांना मिळण्यापूर्वी केंद्र सरकार त्याचे मूल्यमापन करणार असल्याची माहिती मिळत आहे. यासाठी, आयोगाशी संबंधित विकास देखरेख आणि मूल्यमापन कार्यालय () ने या योजनेच्या मूल्यमापनासाठी निविदा मागवल्या आहेत. विशेष म्हणजे पीएम किसान योजनेवर केंद्र सरकार दरवर्षी ६०,००० कोटी रुपये खर्च करत आहे.

किसान योजनेचे



मूल्यांकन करण्याचा उद्देश काय?

या योजनेचे मूल्यांकन करण्याचा उद्देश काय? असा सर्वांनाच प्रश्न पडला असेल. तर या योजनेने शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजा किती प्रमाणात पूर्ण केल्या आहेत. पीएम किसान योजनेचा कृषी उत्पन्नावर काय परिणाम झाला आहे? तसेच, थेट लाभ हस्तांतरण हा शेतकऱ्यांचे समाधान करण्याचा आदर्श मार्ग आहे का? हे समजून घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

किसान योजनेसाठी सरकारने ठेवले ६०००० कोटी रुपये

सरकारने २०२४-२५ या वर्षात या योजनेसाठी ६०,००० कोटी रुपये राखून ठेवले आहेत. जे गेल्या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पीय आणि सुधारित अंदाजाप्रमाणेच आहेत. योजनेचे मूल्यमापन करण्यासाठी २४ राज्यांमधील किमान ५००० शेतकऱ्यांना सर्वेक्षणात समाविष्ट केले जाईल, त्यापैकी टॉप १७ राज्यांमध्ये सुमारे ९५ टक्के पीएम किसान लाभार्थी आहेत. शेतकऱ्यांना किसान योजनेच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम करता येईल यासाठी सरकारने ही योजना सुरु केली आहे. याशिवाय शेतकऱ्यांना या योजनेच्या पैशातून खते व बियाणे वेळेवर खरेदी करता यावीत यासाठी सरकार ही मदत करत आहे.

माती परीक्षणासाठी आवश्यक बाबी जाणून घ्या

जमिनीच्या आरोग्याची काळजी न करता अधिक उत्पादनाच्या हव्यासापोटी शेतकरी रासायनिक खते अंदाधुंदपणे टाकून आपले शेत खराब करतात. त्यामुळे शेताची सुपीकता हळूहळू कमी होत आहे. देशाच्या वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची मागणी पूर्ण करणे हे मोठे आव्हान बनले आहे. खरं तर, ज्याप्रमाणे मानव आणि प्राण्यांना संतुलित आहाराची आवश्यकता असते, त्याचप्रमाणे पिकांना देखील संतुलित आहार (पोषक) आवश्यक असतो. यासाठी शेतातील माती निरोगी असणे अत्यंत आवश्यक आहे कारण जमिनीची चाचणी करूनच जमिनीत कोणते पोषक घटक योग्य, कमी-अधिक प्रमाणात आहेत हे समजते. त्याचबरोबर शेतीमध्ये चांगले उत्पादन होण्यासाठी माती परीक्षण करून घेणे अत्यंत आवश्यक आहे. अशा परिस्थितीत माती परीक्षणाच्या या चार पद्धती जाणून घेऊया.

चार पद्धती वापरून मातीची चाचणी करा :

पहिल्या पद्धतीत शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतातील मातीची चाचणी घेण्यासाठी एक एकर क्षेत्रात सुमारे ८ ते १० ठिकाणी ६ ते ९ इंच खोल व्ही आकाराचे खड्डे करावेत. यानंतर, ट्रॉवेलच्या साहाय्याने, व्ही आकाराच्या काठावरुन १ ते २ सेमी जाडीचा थर पसरवा आणि माती स्वच्छ पिशवीत गोळा करा. यानंतर शेतकऱ्यांनी सर्व ८ ते १० ठिकाणांहून प्राप्त मातीचे नमुने गोळा करून ते मिसळावे. नंतर त्यात असलेले खडे, दगड, गवत, पाने इत्यादी बाहेर काढा. त्यानंतर, जमिनीवर गोलाकार आकारात मातीचा ढीग पसरवा आणि त्याचे चार भाग करा. नंतर त्यांना दोन विरुद्ध भागांमध्ये ठेवा आणि उर्वरित दोन भाग फेकून द्या. अशाप्रकारे तयार केलेले मातीचे नमुने सावलीत वाळवून नंतर एका पिशवीत भरून, मातीच्या नमुन्यातील एका पानावर, शेतकऱ्याचे नाव, वडिलांचे नाव, गावाचे नाव, खाते क्रमांक, खसरा क्रमांक, प्रथम घेतलेले पीक. पुढे कोणते पिक याची माहिती लिहा आणि मातीचा नमुना घेऊन प्रयोगशाळेत पाठवा. तपासादरम्यान या गोष्टी लक्षात ठेवा : माती परीक्षणात मातीचा पीएच, कार्बनची टक्केवारी, नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅश, लोह आणि जस्त यांची चाचणी केली जाते आणि त्यानुसार खत आणि त्याचे प्रमाण सुचवले जाते. माती परीक्षणाच्या प्रक्रियेमध्ये शेतातील मातीचे योग्य नमुने घेणे आणि मातीचे नमुने माती परीक्षण प्रयोगशाळेत योग्यरित्या नेणे यांचा समावेश होतो. हे काम अतिशय काळजीपूर्वक केले पाहिजे कारण जर तुम्ही मातीचा नमुना चुकीचा घेतला असेल तर त्याचे परिणाम देखील चुकीचे असतील.

रोगमुक्त पिकांसाठी ट्रायकोडर्माचा वापर करण्याचे तंत्र

आजच्या जगात सेंद्रिय शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे तसेच प्रगतशील देशांमध्ये सेंद्रिय शेतीमधील उत्पादनास चांगली मागणी आहे. पिकांवर रोगांचे नियंत्रण करण्याकरिता ट्रायकोडर्मा एक प्रभावी रोग नियंत्रक बुरशी आहे आणि तिचा वापर आपण जैविक शेतीमध्ये रोग नियंत्रणासाठी करू शकतो. अलिकडे रासायनिक बुरशीनाशकाला पर्याय म्हणून ट्रायकोडर्माचा वापर होऊ लागला आहे. ट्रायकोडर्माचा वापर जमिनीत वास्तवास असणाऱ्या रोगकारक बुरशी जसे फ्युजॅरियम, रायझोक्टोनिया, स्क्लेरोशियम आणि पिथीयम मुळे उद्भवणारे रोग जसे मर, मुळकूज, खोडकुज तसेच काही बियाण्या द्वारे पसरणाऱ्या रोगांच्या नियंत्रणासाठी करता येतो.

ट्रायकोडर्मा कार्य कसे करते?

ट्रायकोडर्मा अपायकारक बुरशीच्या धाग्यांमध्ये विळखा घालून आपले साम्राज्य पसरविते व नंतर या धाग्यांमध्ये छिद्र करून त्यातील पोषक अन्नद्रव्ये शोषून घेते त्यामुळे अपायकारक बुरशीचा विस्तार थांबतो.

ट्रायकोडर्मा अपायकारक बुरशीला मारक ठरणारे व्हिरीडी हे प्रतिजैवक सुद्धा तयार करते. अपायकारक बुरशीपेक्षा ट्रायकोडर्माची वाढ लवकर होते त्यामुळे ट्रायकोडर्मा ही बुरशी अन्नद्रव्यांसाठी अपायकारक बुरशी बरोबर प्रतिस्पर्धा करून अपायकारक बुरशीच्या वाढीसाठी लागणारे कर्ब, नत्र, व्हिटॅमिन इत्यादी वापरून घेते त्यामुळे अपायकारक बुरशीची वाढ खुंटते.

ट्रायकोडर्माचा वापर : हल्ली ट्रायकोडर्माच्या दोन प्रजाती मुख्यतेकरून वापरण्यात येतात ट्रायकोडर्मा हरजीएनम आणि ट्रायकोडर्मा व्हिरीडी. या बुरशीचे संवर्धन २५० ग्रॅम आणि एक किलो पाकिटाच्या स्वरुपात बाजारात मिळते. प्रामुख्याने ट्रायकोडर्माचा वापर बीज प्रक्रिया, रोपांची प्रक्रिया आणि मातीची प्रक्रिया करण्यासाठी केला जातो.

बीज प्रक्रिया : पेरणीच्या वेळी बियाण्यावर पाणी शिंपडून १ किलो बियाणे ३ ग्रॅम ट्रायकोडर्मा सोबत व्यवस्थितपणे मिसळावे. प्रक्रिया केलेले बियाणे सावलीत वाळवून लगेच पेरणी करावी.

रोपांची प्रक्रिया : ज्या पिकांची लागवड रोपे तयार करून केली जाते त्या पिकांमध्ये लागवडीपूर्वी रोपांची मुळे ट्रायकोडर्मा भुकटी ५०० ग्रॅम, ५ लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात ५ मिनिटांसाठी बुडवून ठेवावीत व नंतर त्यांची लागवड करावी. मातीची प्रक्रिया : मातीची प्रक्रिया करताना १ ते १.५ किलो ट्रायकोडर्मा २५ ते ३० किलो चांगल्या कुजलेल्या शेणखतात मिसळून १ हेक्टर शेतातील मातीत मिसळावे व शक्य असल्यास पाणी द्यावे.

फवारणी : पानावरील बुरशीजन्य रोगांच्या नियंत्रणाकरिता कृषी विद्यापीठांनी विशिष्ट रोगांकरिता केलेल्या शिफारशींचा अवलंब करून फवारणी करावी.

ट्रायकोडर्माचा प्रभावी वापर होण्यासाठी हे करा : पाण्याचा व्यवस्थित निचरा होणाऱ्या जमिनीत ट्रायकोडर्माची वाढ जोमाने होते म्हणून जास्त ओलीत करू नये. जमिनीत सेंद्रिय पदार्थ असल्यास ट्रायकोडर्माची वाढ चांगली होते त्याकरिता शेतात चांगले कुजलेले शेणखत टाकावे. ट्रायकोडर्मा बुरशीचे पाकिट/ द्रावण जास्त काळ न ठेवता लवकरात लवकर वापरावे तसेच वापर होईपर्यंत त्यांना सूर्यप्रकाशापासून दूर थंड ठिकाणी ठेवावे. बियाण्यांच्या प्रक्रियेकरिता ट्रायकोडर्मा सोबत रायझोबियम, ॲझोटोबॅक्टर आणि स्फुरद विरघळणारे जीवाणू इत्यादी जैविक खतांचा वापर करता येतो.

शेतातील पाईललाईनसाठी कसे मिळते अनुदान

शेतकऱ्यांसाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून विविध योजना राबवल्या जात आहेत. या योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मोठा फायदा देखील होत आहे. शेतकऱ्यांना महाराष्ट्र राज्य सरकारच्या माध्यमातून विविध बाबींसाठी अनुदान दिले जाते. यात प्रामुख्याने विहीर खोदण्यासाठी, शेततळे खोदण्यासाठी देखील अनुदान दिले जाते. एवढेच नाही तर शेतकऱ्यांना पाईपलाईनसाठी लागणाऱ्या पीव्हीसी पाईप करिता देखील अनुदान मिळते. सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरु असून, लवकरच पावसाळा सुरु होणार आहे. परिणामी, सध्या अनेक शेतकऱ्यांची पाईपलाईन करण्यासाठी लगबग सुरु असल्याचे पाहायला मिळत आहे. तसेही उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये शेतकरी दरवर्षी पाईपलाईनचे कामे करतात. उन्हाळ्यात अनेक शेतकऱ्यांचे शेत रिकामे असतात. यामुळे उन्हाळ्यात प्रामुख्याने पाईपलाईनची कामे केली जातात. विशेष म्हणजे या पाईपलाईनसाठी लागणाऱ्या पीव्हीसी पाईपवर सरकारकडून अनुदान दिले जात आहे. यासाठी सरकारच्या माध्यमातून एक विशेष योजना राबवली जात आहे.

काय आहे 'ही' योजना?

महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांना बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेअंतर्गत पाईपलाईनसाठी आवश्यक असलेल्या पीव्हीसी पाईपवर अनुदान दिले जाते. पीव्हीसी पाईपसाठी अनुदान मिळवणे हेतू पात्र शेतकऱ्यांना महाडीबीटीच्या अधिकृत संकेतस्थळावर अर्ज करावा लागतो. बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेसाठी पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना पीव्हीसी पाईपसाठी अनुदान मिळते.

किती मिळते अनुदान?

बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना ४३८ मीटर लांबीचे पीव्हीसी पाईप खरेदी करण्यासाठी अनुदान दिले जाते. म्हणजेच जवळपास ७० पाईप खरेदी करण्यासाठी अनुदान दिले जाते. याअंतर्गत कमाल ३० हजार रुपयांचे अनुदान मिळू शकते. शेतकऱ्यांना यापेक्षा जास्तीचे अनुदान मिळत नाही. या योजनेअंतर्गत राज्यातील सर्वच शेतकऱ्यांना अनुदान मिळत नाही. फक्त अनुसूचित जाती प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी ही बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना सुरू झाली असून, याच शेतकऱ्यांना या योजनेअंतर्गत पीव्हीसी पाईप खरेदीसाठी अनुदान मिळते.

कोणाला मिळतो योजनेचा लाभ?

याशिवाय ज्या शेतकऱ्यांचे वार्षिक उत्पन्न दीड लाख रुपयांपेक्षा कमी असते. त्यांना याचा लाभ मिळतो. किमान वीस गुंठे आणि कमाल सहा हेक्टर जमीन असलेल्या शेतकऱ्यांना याचा लाभ मिळतो. एकदा या योजनेचा लाभ घेतल्यानंतर पुढील ५ वर्षे याच योजनेचा लाभ मिळत नाही. बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना पीव्हीसी पाईपसाठी अनुदान मिळवायचे असेल तर त्यांना महाडीबीटीच्या अधिकृत संकेतस्थळावर अर्ज करावा लागतो. अर्ज सादर झाल्यानंतर लॉटरी पद्धतीने शेतकऱ्यांची निवड होते आणि मग पूर्वसंमती दिली जाते. पूर्वसंमती नंतर शेतकऱ्यांना पाईप खरेदी करावी लागतात. यानंतर आवश्यक डॉक्युमेंट अपलोड करावे लागतात आणि मग अनुदानाचे पैसे हे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होतात.

महत्वाच्या घटना

- ५२६ : सिरीया आणि अँटोचियात झालेल्या एका भूकंपात सुमारे ३,००,००० लोकांचा मृत्यू.
- १४९८ : पोर्तुगालचा वास्को-द-गामा दोनशे खलाश्यांसह भारतातील कालिकत बंदरामध्ये येऊन पोहचला.
- १५४० : छायाचित्रकार अब्राहम ऑरटेलियस यांनी थॅट्रम ऑरबिस टेरारम हा पहिला आधुनिक ॲटलास प्रकाशित केला.
- १८७३ : लेव्ही स्ट्रॉस आणि जेकब डेव्हिस यांनी तांब्याची बटणे असलेल्या निळ्या जीन्स चे पेटंट घेतले.
- १८९१ : थॉमस एडीसन यांनी किनेटोस्कोप चे पहिला प्रोटोटाइप प्रदर्शित केले
- १९०२ : क्यूबा देश अमेरिकेपासून स्वातंत्र्य झाला.
- १९४८ : चिआंग काई शेक चीन गणराज्यचे पहिले राष्ट्रपती म्हणून निवडून आले.
- १९९५ : रशियाने मानव रहित अंतरीक्ष यान 'स्पेक्त्र' च प्रक्षेपण केलं.
- १९९६ : देशाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल माजी केंद्रीय अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांना ऑनेस्ट मॅन ऑफ द'इयर हा पुरस्कार जाहीर.
- २००० : राष्ट्रकुल संसदीय संघटनेच्या आशिया विभागाच्या अध्यक्षपदी लोकसभेचे सभापती जी. एम. सी. बालयोगी यांची एकमताने निवड झाली.
- २००१ : चित्रपट निर्माते व लेखक अण्णासाहेब देऊळगावकर यांना अखिल भारतीय चित्रपट महामंडळातर्फे चित्रभूषण पुरस्कार जाहीर.
- २०१४ : लोकसभा निवडणुकांत बहुमत मिळवून भारतीय जनता पक्ष भारतात सत्तेवर. नरेन्द्र मोदीची पंतप्रधानपदी नेमणूक.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

- १८२२ : फ्रेडेरिक पॅसी, नोबेल पारितोषिक विजेता फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ.
- १८५० : विष्णुशास्त्री चिपळूणकर, आधुनिक मराठी गद्याचे जनक, ग्रंथकार.
- १८५१ : ग्रामोफोन रेकॉर्ड चे शोधक एमिल बर्लिनर यांचा जन्म. (मृत्यू: ३ ऑगस्ट १९२९)
- १८६० : एडुआर्ड बुखनेर, नोबेल पारितोषिक विजेता जर्मन रसायनशास्त्रज्ञ.
- १८८२ : सिग्रिड उंडसेट, नोबेल पारितोषिक विजेता नॉर्वेजियन लेखिका.
- १८८४ : प्राच्यविद्यासंशोधक, भाषाशास्त्रज्ञ व साहित्यसमीक्षक पांडुरंग दामोदर गुणे यांचा जन्म. (मृत्यू: २५ नोव्हेंबर १९२२)
- १९०० : छायावादी विचारधारेतील हिन्दी कवी सुमित्रानंदन पंत यांचा जन्म. (मृत्यू: २८ डिसेंबर १९७७)
- १९०६ : सुप्रसिद्ध भारतीय आधुनिक शिल्पकार व चित्रकार रामकिंकर बैज यांचा जन्मदिन.
- १९१३ : हेव्हलेट-पॅकार्ड चे सहसंस्थापक विल्यम रेडिंग्टन हेव्हलेट यांचा जन्म. (मृत्यू: १२ जानेवारी २००१)
- १९१५ : इस्त्रायलचे परराष्ट्रमंत्री, कृषीमंत्री आणि संरक्षणमंत्री, इस्रायली सेना प्रमुख मोशे दायान यांचा जन्म. (मृत्यू: १६ ऑक्टोबर १९८१)
- १९१८ : भारतीय सैन्य दलातील सर्वोच्च सन्मान परमवीर चक्र सन्मानित भारतीय लष्कर दलातील सेवानिवृत्त अधिकारी मेजर पिरुसिंह यांचा जन्मदिन.
- १९४४ : रेड बुल चे सहसंस्थापक डीट्रिख मत्थेकित्झ यांचा जन्म.
- १९५२ : कॅमेरुनचा फूटबॉलपटू रॉजर मिला यांचा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

- १५७१ : राघवचैतन्यांचे विख्यात शिष्य व संत तुकारामांचे गुरु, केशवचैतन्य ऊर्फ बाबाचैतन्य यांनी जुन्नरजवळील ओतूर येथे समाधी घेतली.
- १७६६ : इंदूरच्या राज्याचे संस्थापक, मराठेशाहीतील पराक्रमी सेनापती व मुत्सद्दी मल्हारराव होळकर यांचे निधन. (जन्म: १६ मार्च १६९३)
- १८७८ : समाजसुधारक व संस्कृत विद्वान कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचे निधन.
- १९२९ : स्वातंत्र्यपूर्व भारतातील क्रांतिकारक व महात्मा गांधी यांच्या चंपारण सत्याग्रहातील प्रमुख सदस्यांपैकी एक राजकुमार शुक्ल यांचे निधन.
- १९३२ : लाल-बाल-पाल या त्रयीतील स्वातंत्र्यसेनानी बिपिन चंद्र पाल यांचे निधन. (जन्म: ७ नोव्हेंबर १८५८)
- १९५७ : भारतीय स्वातंत्र्यसेना व राजकारणी तसचं, मद्रास प्रांताचे भूतपूर्व मुख्यमंत्री व आंध्रप्रदेशचे पहिले मुख्यमंत्री तंगुटुरी प्रकाशम पंतुलु यांचे निधन.
- १९६१ : कम्युनिस्ट नेते व प्रभावी वक्ते भाई विष्णूपंत चितळे यांचे निधन.
- १९९२ : सामाजिक कार्यकर्त्या डॉ. लीला मूळगांवकर यांचे निधन. (जन्म: १० ऑक्टोबर १९१६)
- १९९४ : आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री के. ब्रम्हानंद रेड्डी यांचे निधन. (जन्म: २८ जुलै १९०९)
- १९९७ : इंडियन एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त, शिक्षणक्षेत्रातील विश्वकर्मा माणिकराव लोटलीकर यांचे निधन.
- २०१२ : भारतीय मानववंशशास्त्रज्ञ लीला दुबे यांचे निधन. (जन्म: २७ मार्च १९२३)
- २०१२ : रिमोट कंट्रोल चे शोधक यूजीन पॉली यांचे निधन. (जन्म: २९ नोव्हेंबर १९१५)
- २००० : एस.पी. गोदरेज, भारतीय उद्योगपती

डॉ. आंबेडकर चौक ते माने हॉस्पीटल रस्त्यावर समस्यांचा ढिगारा

प्रशासकाचे कमालीचे दुर्लक्ष; कार्यवाहीची मागणी

गेवराई । प्रतिनिधी

येथील राष्ट्रीय महामार्ग अंतर्गत ताकडगाव रोडवर न .प हद्दीत घाणीचे साम्राज पसरून आजारांमध्ये मोठी वाढ झाली आहे . नाल्यातील कचरा व घाण गेली कित्येक महिने उचलली जात नाही . ताकडगाव जकात नाका , सरस्वती कॉलनी नंबर २, सिद्धीविनायक कॉलनी, हनुमान नगर , सेंट झेवियर्स स्कूल रोड, अंतर्गत रस्ते, ढोराज नगर, शारदा स्कूल, बाळराजे नगर , इंजि .पत्की यांच्या घराकडे जाणारा अंतर्गत रस्ता, श्रीराम हॉस्पीटल ते डॉ खाडे हॉस्पीटल भाग नगर परिषद हद्दीत येतो . या परिसरातील खोल खोल नाल्या , त्यात साचलेली घाण आणि कचरा यामुळे दुर्गंधी सुटून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे . या ताकडगाव रोडवर समस्यांचा ढिगारा आहे .

डांबरी रस्ता झाला पण पांढरे पट्टे, गतिरोधक नाहीत, स्पीड ब्रेकर नाही , स्पीड ब्रेकर दिशादर्शक फलक टाकण्यात आलेले नाहीत . का टाकले नाहीत हे एक कोडंच आहे .नाल्यांचा कचरा उचलला जात नाही . या रोडवर शैक्षणिक शाळा , माध्यमिक व उच्च माध्यमिक महाविद्यालये, बालक मंदिर , खाजगी कोचिंग क्लासेस , नोकरदार वर्ग मोठ्या प्रमाणात आहेत . आंबेडकर चौकातून ताकडगाव रोडला जाणाऱ्या पाईंटला ॲटो

रिक्षावाले राष्ट्रीय महामार्गावर रस्त्याच्या मध्येच रिक्षा उभी करतात . जकात नाका पॉईंट ते डॉ .रांदड हॉस्पीटल येथे दुकाने आहेत . त्यांच्या समोरच दुचाकी मोठ्या प्रमाणात उभ्या असतात . त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे . बुलेट गाडीमधून तोफेचा आवाज काढणारे तरुण बेभान गाडी चालवतात . त्यांच्यावरही पोलिस दलातील अधिकारी व कर्मचारी यांचे कुणाचेच नियंत्रण नाही .वाळू, मुरूम, डब्बरचे ट्रॅक्टर व हायवा गाडया सुसाट वेगाने या रोडवर चालविल्या जातात . लहान शाळकरी मुलं आणि जेष्ठ नागरिक यांचे जाणे – येणे या रस्त्याने चालू असते . या सर्वांवर नियंत्रण करायचे असेल तर गतिरोधक त्वरित बसविणे आवश्यक आहे . या रस्त्यावर अनेकांनी आपापल्या दुकाने व प्रतिष्ठानेसमोर अनधिकृत शेड टाकून रोडपर्यंत दुकाने , दुकानांचे विक्रीचे साहित्य रस्त्यावर मांडून व्यवसाय सुरू केले आहेत . त्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होत आहे . ही अतिक्रमित जागा न .प. सी ओ तथा प्रशासक मांडुरके यांनी पाडून रस्ता मोकळा करावा , या रस्त्यावर जीव घेणे खड्डे पडले आहेत . डॉ ढोराज हॉस्पीटलसमोर, श्रीराम हॉस्पीटलच्या जवळ तसेच न्यू हायस्कूलसमोर नाली कोंडून २ वर्ष झाले पण नाली उखडून नवी तयार करावी .नव्याने नाली केली तरच नाल्यातील अशुद्ध घाण रस्त्यावर येणार नाही . सध्या तेथे चिंतनीय अवस्था झाली आहे . पवार हॉस्पीटल व ढोराज हॉस्पिटलसमोर कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे . स्वच्छतेचे कंत्राट घेतलेल्या कंत्राटदाराच्या दृष्टीस ही बाब आणून दिली आहे . परंतू बघू म्हणतात . सरस्वती कॉलनी नं . २ भागात न. प .चे ३ नगरसेवक निवडून आलेले आहेत पण न्यू हायस्कूल समोरील अतहरखा पठाण ते ॲड .नाकाडे निवास रोड, नाकाडे ते प्रविण पंडित रोड, पंडित ते जरांगे सर रोड , मंगेश खरात – जगदाळे ते सोलाने निवास हा रस्ता गेल्या १५ वर्षापूर्वी तयार केलेला आहे . तो मृत्यूची शेवटची वाट पाहात आहे . न्यू हायस्कूल शेजारी फळ व भाजीपाला विक्रेते नालीपासून पुढे रोडवर १० फूट आले आहेत . या भागातील गर्दी पाहता त्यांनी मागे सरकून नाल्यावर हातगाड्या उभ्या केल्या तर अपघात होणार नाही . प्रशासक आणि स्वच्छता निरीक्षक यांनी नियमित पाहणी केली आणि हातगाड्यावर भाजी विक्रेते मागे सरकतील . या भागात राहणारे ३ नगरसेवक व लाभार्थी कार्यकर्ते या समस्येकडे पाहून डोळेझाक करीत आहेत . नगर परिषद प्रशासक मांडुरके यांच्या नियंत्रणात आहे . त्यांनी कार्यालयाच्या बाहेर स्वच्छता निरीक्षक यांच्यासह येऊन प्रत्यक्ष पाहणी करावी .तशी त्यांची ड्युटीच आहे . गेवराई शहरात मतदार नसलेल्या नवनवीन भागात सिमेंटची रस्ते बांधण्यात आली आहेत पण सरस्वती कॉलनी नं २ मधील समस्यांकडे कुणाचे लक्ष नाही . मतदान मागायला धावत येतात पण जनतेची कामे करीत नाहीत . न . प . मुख्याधिकारी तथा प्रशासक मांडुरके यांनी जातीने लक्ष घालून कार्यवाही करावी, अशी मागणी ताकडगाव रोड वरील सर्व नागरिकांनी केली आहे .

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानंतरही घिसडी समाज आजही उपेक्षितच

ज्योतिराम पाढंरपोटे

माजलगाव : सर्रर्रर्र ऊत करत चालणारा भाता, त्यातून निघणारी आग, घणावर पडणारे घाव आणि कणखर लोखंडाला आकार देणारे घिसडी बांधवांचे हात, ज्या हाताने धातूंचे विविध साहित्य घडवतात ते हात स्वतःचे भविष्य मात्र घडवू शकत नाहीत, हे चित्र ग्रामीण भागात आजही काहीसे दुर्मीळ झाले असले तरीही पाहावयास मिळते मात्र, अद्यापही हा समाज उपेक्षितच आहे. त्यांच्या मुलांची शिक्षणा अभावी आबाळ होते कारण भटकंती करताना नेमका गाव कोणता ? हाही प्रश्न असतोच.

उन्हाळ्यात शेती कामाला वेग येतो. यावेळी या समाजाची

पारंपारिक उद्योगाला चालना देण्यासाठी ज्याप्रमाणे इतर सर्व समाज घटकांमध्ये महामंडळे आहेत त्या पद्धतीने घिसाडी समाजासाठी महाराणा प्रताप महामंडळ स्थापन करून उद्योगास अर्थसहाय्य करावे, तसेच घिसाडी समाजातील लोकांच्या निवासाविषयी आणि शिक्षणाविषयी शासनाने विशेष लक्ष देणे आवश्यक आहे

– रामेश्वर चव्हाण मोठीवाडी

आवर्जून आठवण होते. शेती कामासाठी लागणारे साहित्य जुळवाजुळवीसाठी शेतकरी धावपळ करतात. कुऱ्हाडी, कुदळ,औताची पास,विळे, खोरे यांना धार लावण्यासाठी ग्रामीण भागात घिसडी बांधवांकडे जाऊन काम केले जाते. पोलादी लोखंडाला आकार देऊन आपल्या घणाच्या साहाय्याने वेगवेगळे शेतीविषयक औजारे बनविणे आणि विकणे, हा या समाजाचा पारंपरिक व्यवसाय. या कामातून जे काही अल्प मिळकत मिळते, त्यातून हा समाज आपली गुजराण करतो. आजही हा समाज समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर आहे. अतिशय गरिबीत जगत आहे.

रस्त्याच्या कडेला झोपडी टाकून आपला पोटापाण्याचा उद्योग करायचा आणि दोन वेळ पोट भरायचे, हेच त्यांचे काम. या समाजात शिक्षणाचे प्रमाण अतिशय नगण्य असल्याचे व व्यसनाधीनतेचे प्रमाण मोठे असल्याचे दिसून येते.

कपिलधारवाडी येथे त्री दिवशी किर्तन महोत्सवास प्रारंभ

बीड । प्रतिनिधी

इथून जवळच असलेल्या कपिलधार वाडी येथे महंत ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे ,श्री महंत ह.भ.प.हरिहारनंद भारती महाराज श्रीक्षेत्र तपोवन मोरेश्वर संस्थान कोळवाडी यांच्या मार्गदर्शनाने व आशीर्वादाने दिनांक १९-५-२०२४ वैशाख शुद्ध ।। ११। । आज पासून भव्यदिव्य त्री दिवशी कीर्तन महोत्सवाचे प्रारंभ करण्यात आलेले आहे.

या कीर्तन महोत्सवामध्ये ह.भ.प बाल कीर्तनकार सोहम महाराज सातपुते व दि २०/५/२४ रोजी ह.भ.प ज्ञानेश्वर महाराज काकडे यांचे हरिकीर्तन होणार आहे. दिनांक २१/५/२०२४ मंगळवारी सकाळी १० ते१२ वेळेमध्ये महंत ह.भ.प.लक्ष्मण

महाराज मेंगडे मठाधिपती नेकनुर यांचे काल्याचे सुश्राव्य कीर्तन होणार आहे व महंत हरिहारनंद भारती महाराज श्रीक्षेत्र तपोवन मोरेश्वर संस्थान कोळवाडी व विश्वनाथ आप्पा सलगार श्री. क्षेत्र कपिलधार यांच्या प्रमुख उपस्थिती नंतर महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तरी या कीर्तन महोत्सवाचा व श्रवण भक्तीचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळी कपिलधारवाडी व वाघेश्वरी मित्र मंडळ कपिलधारवाडी यांनी केले आहे. तर या नाम सप्ताहाला या महाराज मंडळींची अनमोल सात लाभत आहे. मृदंगाचार्य सर्वश्री ह.भ.प योगेश महाराज जोगदंड कोळवाडी, गायनाचार्य सर्वश्री ह.भ .प शिवाजी महाराज निवडे कामखेडा, शेषराव महाराज चव्हाण कोळवाडी,महादेव महाराज येडे मोरगाव, अर्जुन महाराज कांगडे ,अशोक महाराज येडे, सुशील महाराज शिंदे व काकडा नेतृत्व सर्वश्री हरिदास महाराज खुळे, वसंत महाराज शिंदे, हार्मोनियम वादक सर्वश्री शेषराव महाराज चव्हाण, महादेव रसाळ व समस्त गावकरी मंडळ कपिलधारवाडी व वाघेश्वरी तरुण मित्र मंडळ कपिलधारवाडी.

वाढलेले वजन कमी करण्यासाठी

नागरिकांचा व्यायाम

अंबाजोगाई । प्रतिनिधी

वाढलेले वजन कमी करण्यासाठी नागरीक व्यायाम करण्यावर जास्त भर देताना दिसत आहेत विशेष म्हणजे अंबाजोगाईतील मुख्य रस्त्यावर महिला व पुरूषांची गर्दी दिसत आहे. आहारावर नियंत्रण,तसेच फिरण्यावर भर देताना महिला पुरुष दिसत आहेत.

याबाबत वैद्यकीय सुत्रांनी दिलेली माहिती अशी की वजन कमी करण्यासाठी केवळ आहारावर अवलंबून राहणे योग्य नाही, आहारासह काही व्यायाम देखील करावे लागतील अशा टिप्स आहेत. जेणेकरून अतिरिक्त कॅलरी बर्न करता येतील वजन कमी करण्यासाठी एंडोमोर्फ बॉडी टाइपच्या नागरिकांनी काय करावे?वजन कमी करण्यासाठी एंडोमोर्फ बॉडी टाइपच्या नागरिकांनी पचनक्षमता सुधारण्यावर भर द्यावा. दररोज पोट साफ व्हावे यासाठी आवश्यकता भासल्यास औषधे घ्यावीत. ताजी फळे, जास्तीत जास्त प्रथिनांचे अर्थात प्रोटिन्सचे सेवन करावे. तांदूळ (भात आदी) तसेच इतर कार्ब्स जास्त असलेले पदार्थ खाणे टाळावे. मीठ आणि मसाले यांचे सेवन नियंत्रित करावे. दररोज व्यायाम करावा आणि नियमितपणे व्यायामाची तीव्रता वाढवत जावी.वजन कमी करण्यासाठी मेसोमोर्फ बॉडी टाइपच्या नागरिकांनी काय करावे? :प्रामुख्याने या गटात खेळाडू, नियमित व्यायाम करणारे तसेच कामांच्या निमित्ताने नकळत भरपूर व्यायाम होणारे या मंडळींचा समावेश होतो.

माणसाची विखूरलेली मने एकत्रित आणण्यासाठी सप्ताहाचा धर्ममंडप – चैतन्य महाराज राऊत

शिरूर । प्रतिनिधी

संसारामध्ये माणूस स्वार्थी जीवन जगतो, माणसाच्या स्वार्थीपणामुळे माणसांमध्ये आपुलकी कमी होऊन एकमेकाबद्दलची मने विखुरली गेली आहेत. या विखुरलेल्या मनांना एकत्रित करण्यासाठी आणि दुःखमय संसारातून परमार्थिक आनंद घेण्यासाठी हा अखंड हरिनाम सप्ताहाचा धर्ममंडप आहे. या धर्म मंडपात आलेला प्रत्येक माणूस समाधानी आणि आनंदी होत असल्याचे प्रतिपादन बाल कीर्तनकार हभप. चैतन्य महाराज राऊत यांनी श्रृंगऋषी गडावर केले आहे.

शिरूर कासार तालुक्यातील श्री. क्षेत्र श्रृंगऋषी गडावर वै.महंत तुकाराम बाबा यांच्या पाचव्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त गडाचे मठाधिपती महंत सुरेशानंद महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली व पंचक्रोशीतील भाविक भक्तांच्या आयोजनातून गेल्या पाच दिवसापासून भव्य स्वरूपात अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या भक्तीमय वातावरणामध्ये पार पडत आहे. या सप्ताहातील पाचव्या दिवसाचे कीर्तन पुष्प गुंफताना महाराज बोलत होते. पुढे बोलताना महाराज म्हणाले, अखंड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून समाज मनावरती मोठा जनजागृतीचा प्रभाव पडत आहे.

एकमेकांमधील वैर विसरून लोक या ठिकाणी येतात आणि गुण्यागोविंदाने अध्यात्मिक आनंद लुटतात. या ठिकाणी आल्यानंतर संसारातील दुःखांचा माणसांना विसर पडतो. ही माणसे एकत्रित आली म्हणजे धार्मिक कार्याला मोठी गती प्राप्त होते. आणि या सप्ताहासारखे नेत्रदीपक सोहळे पार पडतात. म्हणून साधुसंतांनी अशी अखंड हरिनाम सप्ताहाची परंपरा घालून दिलेली आहे. या परंपरेला गडाचे मठाधिपती महंत सुरेशानंद महाराज मोठ्या प्रयत्नातून खतपाणी घालत आहे. समाज उद्धाराचे कार्य करत आहे. या कार्यासाठी सर्वांनी तन मनधनाने हातभार लावत जा असे आवाहनही महाराजांनी केले. यावेळी महंत सुरेशानंद महाराज यांच्यासह, विशाल महाराज कारंडे, तिर्थराज महाराज धस, कृष्णा महाराज सटले, दत्ता महाराज भालेकर, अर्जुन महाराज नांगरे, माऊली महाराज सजगणे, प्रशांत महाराज वडघणे आदींची उपस्थिती होती. या कीर्तनासाठी मृदंगाची साथ संगत हभप. गणेश महाराज कदम व अंकुश महाराज काळे यांनी दिली होती.

रात्री अपरात्रीही लोडशेडींग, वीज वितरण विभागाचा मनमानी कारभार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

गेल्या काही महिन्यांपासून अंबाजोगाई शहर व परिसरात केव्हाही लोडशेडींग सुरु झाले असून उन्हामुळे असह्य उकाडा यामुळे नागरिक त्रस्त आहेत. कुठलेही वेळापत्रक न देता दिवसात कोणत्याही वेळी भारनियमन करण्यात येत आहे. हा वीज वितरण कंपनीचा मनमानी कारभार आहे. खरे पाहता वसुलीचे प्रमाण चांगले आणि वीजचोरी कमी असलेल्या ठिकाणी भारनियमन करण्यात येत नसते हा नियम असतानाही

महावितरणकडून अनियंत्रित भारनियमन करण्यात येते भारनियमनाला कसलेही वेळापत्रक नाही. रात्री-अपरात्री, पहाटे, दुपारी अशी कोणत्याही वेळेस वीजपुरवठा खंडित केला जातो. दिवसभरात कधीही, कोणत्याही वेळेस भारनियमन केले जाते. आधीच वाढलेल्या तापमानामुळे असह्य उकाडा आणि त्यात नियोजनशून्य असलेले अनियंत्रित भारनियमन यामुळे महिला, बालकांसह व्यापारी, शेतकरी सर्वचजण त्रस्त झाले आहेत. विशेष म्हणजे भार नियमनामुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. एवढे तुघलकी अनियंत्रित भारनियमन कोठेही नाही. त्यामुळे महावितरण विरोधात रोष वाढलेला आहे.

ठिकाणी वीजचोरीचे प्रमाण नगण्य आहे. जिथे वसुली चांगली आणि वीजचोरी नसते त्या ठिकाणी भारनियमन करू नये असे असतानाही भारनियमन चुकलेले नाही. ग्रामीण भागात सातत्याने भारनियमन होत असल्याने शेतीपंपाला अत्यंत कमी वीज मिळते. धनेगावच्या पंपहाऊसवर व्होल्टेज कमी भेटत असल्याने पाणी उपसा कमी होत असून त्यामुळे अंबाजोगाईत विलंबाने शिवाय कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे.

कृषी सहसंचालक डॉ.मोटे यांच्या मार्गदर्शनाखाली खरीप हंगाम पूर्व आढावा बैठक

बीड। प्रतिनिधी

खरीप हंगामापूर्व आढावा बैठक २०२४ उपविभागीय कृषी अधिकारी बीड व उपविभागीय कृषी अधिकारी माजलगाव आयोजित के. एस. के अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय म्हसोबा फाटा बीड .या ठिकाणी घेण्यात आली .आढावा बैठकीमध्ये तालुका बीड, आष्टी ,पाटोदा , शिरूर कासार वडवणी, गेवराई तालुक्यातील सर्व प्रक्षेत्रावर काम करणारे तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी ,कृषी पर्यवेक्षक कृषी सहाय्यक बंधू-भगिनी व अधिकारी कर्मचारी यांना खरीप हंगामपूर्व आढावा बैठकीमध्ये जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाबासाहेब जेजुरकर यांनी खरीप पूर्व हंगाममध्ये केलेल्या कामाची प्रस्ताविकामध्ये माहिती दिली. यामध्ये उन्हाळ्यामध्ये प्रत्येक शेतकऱ्यांनी मातीचा नमुना तपासून घेणे,.मातीच्या नमुन्याचे दिलेले टार्गेटपूर्ण करून घेणे,रोजगार हमी योजनेअंतर्गतफळबाग लागवड लाभार्थींना मार्गदर्शन करणे.दुष्काळ सदृश्य परिस्थितीत फळबाग वाचवण्यासाठीआच्छादनाचे महत्व,प्रधानमंत्री सूक्ष्म प्रक्रिया उद्योगांमध्ये लाभार्थींना योग्य मार्गदर्शन करून प्रस्ताव तयार करणे,हवामान आधारित फळबाग जगण्यासाठी सी आर ए तंत्रज्ञानाचा वापर करणे, बीज प्रक्रिया बद्दल सविस्तर माहिती व मार्गदर्शन विभागीय कृषी सहसंचालक डॉ. तुकाराम मोटे यांनी केले .

यावेळी डॉ. तुकाराम मोटे सर यांना महाराष्ट्र शासन कृषी विभागाचा पद्मश्री डॉक्टर विठ्ठलराव विखे पाटील हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा शाल ,श्रीफळ देऊन कृषी विभागाच्या वतीने

आदरणी विभागीय कृषी सहसंचालक छत्रपती संभाजी नगर डॉ. तुकाराम मोटे यांच्या मार्गदर्शनाखाली खरीप हंगाम पूर्व आढावा बैठक २०२४ संपन्न झाली*

खरीप हंगामापूर्व आढावा बैठक २०२४ उपविभागीय कृषी अधिकारी बीड व उपविभागीय कृषी अधिकारी माजलगाव आयोजित के. एस. के अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय म्हसोबा फाटा बीड ..या ठिकाणी घेण्यात आली .आढावा बैठकीमध्ये तालुका बीड, आष्टी ,पाटोदा , शिरूर कासार वडवणी, वडवणी, गेवराई तालुक्यातील सर्व प्रक्षेत्रावर काम करणारे तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी ,कृषी पर्यवेक्षक कृषी सहाय्यक बंधू-भगिनी व अधिकारी कर्मचारी यांना खरीप हंगामपूर्व आढावा बैठकीमध्ये बीड जिल्ह्याचे लोकप्रिय व कर्तव्यदक्ष जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बीड बाबासाहेब जेजुरकर यांनी खरीप पूर्व हंगाममध्ये केलेल्या कामाचा प्रस्ताविकामध्ये माहिती दिली.... यामध्ये उन्हाळ्यामध्ये प्रत्येक शेतकऱ्यांनी मातीचा नमुना तपासून घेणे, मातीच्या नमुन्याचे दिलेले टार्गेटपूर्ण करून घेणे., रोजगार हमी योजनेअंतर्गतफळबाग लागवड लाभार्थींना मार्गदर्शन करणे, दुष्काळ सदृश्य परिस्थितीत फळबाग वाचवण्यासाठीआच्छादनाचे महत्व , प्रधानमंत्री सूक्ष्म प्रक्रिया उद्योगांमध्ये लाभार्थींना योग्य मार्गदर्शन करून प्रस्ताव तयार करणे. हवामान आधारित फळबाग जगण्यासाठी सी आर ए तंत्रज्ञानाचा वापर करणे. बीज प्रक्रिया बद्दल सविस्तर माहिती व मार्गदर्शन विभागीय कृषी सहसंचालक डॉ. तुकाराम मोटे यांनी केले . यावेळी डॉ. तुकाराम मोटे सर यांना महाराष्ट्र शासन कृषी विभागाचा पद्मश्री डॉक्टर विठ्ठलराव विखे पाटील हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा शाल ,श्रीफळ देऊन कृषी विभागाच्या वतीने जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाबासाहेब जेजुरकर यांनी सत्कार केला.तसेच अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या वतीने प्रमुख म्हणून गोविंदराव सोळुंके यांनी पुष्पगुच्छ व शाल देऊन सत्कार केला. महाराष्ट्र शासन कृषी विभागाचा राज्यस्तरावरचा बीड जिल्ह्यात पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील पुरस्कार २०२२ हा कृषी पर्यवेक्षक अर्जुन चव्हाण शासकीय फळ रोपवाटिका राजुरी न. यांना जाहीर झाल्याबद्दल त्यांचा सत्कार डॉ. तुकाराम मोटे विभागीय कृषी सहसंचालक छत्रपती संभाजी नगर,बाबासाहेब जेजुरकर(जिल्हा अधीक्षक कृषी बीड) गोविंदराव सोळुंके (प्राचार्य प्रमुखअन्न तंत्रज्ञान महाविद्यालय मसोबा फाटा बीड) यांच्या हस्ते करण्यात आला. आढावा बैठकीमध्ये शेतकऱ्यांना वेळेवर मार्गदर्शन,निविष्ठा, बीज प्रक्रिया याबाबत योग्य मार्गदर्शन करण्यात आले.उप विभागीय कृषी अधिकारी उद्धव गर्जे ,उपभागीय कृषी अधिकारी अभय वडकुते ,तालुका कृषी अधिकारी बी.आर गंडे, तालुका कृषी अधिकारी आष्टी गोरख तरटे,तालुका कृषी अधिकारी पाटोदा शिंदे,तालुका कृषी अधिकारी शिरूर कासार राजेंद्र नेटके ,तंत्र अधिकारी बी.बी बांगर, तंत्र अधिकारी वाघसर ,तंत्र अधिकारी मगर सर सर्व मंडळ कृषी अधिकारी ,सर्व कृषी पर्यवेक्षक ,कृषी सहाय्यक बंधू-भगिनी व पोखरा, आत्मा योजनेतील कर्मचारी अधिकारी बांधव उपस्थित होते.कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन अर्जुन चव्हाण यांनी केले.जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाबासाहेब जेजुरकर यांनी सत्कार केला. तसेच अन्न तंत्रज्ञान महाविद्याषलयाच्या वतीने प्रमुख म्हणून गोविंदराव सोळुंके यांनी पुष्पगुच्छ व शाल देऊन सत्कार केला.

अवकाळी वादळाने अंबाजोगाई बँकेच्या फर्निचरचे नुकसान

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सध्या मराठवाडा परिसरात अनेक ठिकाणी अवकाळीने धुमाकूळ घातला आहे. शेती, शेतकऱ्यांसह मोठमोठी वृक्ष, शासकीय तथा निमशासकीय कार्यालये बँका आदींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. असेच अवकाळी वादळाने अंबाजोगाई शहरात धुमाकूळ घातला होता. रविवार पेठ परिसरात एक घरावर मोठा वृक्ष उन्मळून पडल्याने घराचे मोठे नुकसान झाले आहे. त्याचबरोबर अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेच्या बाहेरील बाजूस लावलेले अल्कोपॅनल तसेच मोठी लोखंडी फ्रेम (जाळी) ही त्या वादळामुळे खाली कोसळली. त्यामध्ये तेथे लावलेल्या काचा , अल्कोपॅनल चे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.अल्को पॅनल व लोखंडी फ्रेम काचासह खाली कोसळल्याने बँकेचे आर्थिक नुकसान झाले आहे. मात्र यामध्ये सुदैवाने कुठलीही जीवित हानी झाली नाही.

अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँक ही एक अत्यंत नावाजलेल्या बँकेपैकी एक अशी बँक आहे.५०० कोटींच्या वर ठेवी असलेल्या बँकेकडे केवळ अंबाजोगाई शहरातच ३५००० खातेदारक आहेत. त्यामुळे बँकेत दररोज हजारावर ग्राहक आपला दैनंदिन व्यवहार करण्यासाठी येतात.अवकाळी वादळ आलेल्या दिवशी शनिवार असल्यामुळे त्या दिवशी ग्राहकांची संख्या अतिशय कमी असल्यामुळे त्या दिवशी सुदैवाने कुठलीही जिवीत हानी झाली नाही.

स्वाती मालीवाल प्रकरणी केजरीवाल गप्प का? - भाजपचा सवाल

दिल्ली । वृत्तसेवा

स्वाती मालीवाल मारहाण प्रकरणी अरविंद केजरीवाल मौन का बाळगुन आहेत, असा सवाल भाजपने विचारला आहे. तर स्वाती मालीवाल यांच्याशी गैरवर्तन करणाऱ्या विभव कुमारला वाचवण्याचा आपचा प्रयत्न आहे, असाही आरोप भाजपने केला आहे. अरविंद केजरीवाल यांनी पक्षाच्या नेत्यांसह भाजप मुख्यालयाला घेराव घालण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर भाजपने केजरीवालांना प्रत्युत्तर देत अनेक प्रश्नांची सरबत्ती केली.

स्वाती मालीवाल मारहाण प्रकरणावरून आम आदमी पक्ष आणि भाजपमध्ये चांगलीच जुंपली आहे. अरविंद केजरीवाल आणि आम आदमी पक्षाने भाजप मुख्यालयाला घेरण्याचा प्रयत्न रविवारी केला. त्यानंतर दिल्ली भाजपचे प्रदेशाध्यक्ष वीरेंद्र सचदेवा यांनी पत्रकार परिषद घेऊन अरविंद केजरीवालांना धारेवर धरले. ''स्वाती मालीवाल यांना ज्या प्रकारे घरी बोलावून मारहाण करण्यात आली. त्यावर त्यांच्याकडे उत्तर नाही. इतर गोष्टी करण्यापेक्षा केजरीवाल या प्रकरणी का गप्प आहेत? एवढेच त्यांनी सांगावे,'' असे म्हणत केजरीवाल यांच्यावर टीका केली. या प्रकरणी भाजपाच्या राष्ट्रीय प्रवक्त्या शाझिया इलमी,



शहजाद पूनावाला यांनीही अरविंद केजरीवाल यांच्यावर टीकेची झोड उठवली. आम आदमी पक्ष आता आम अपराधी पक्ष झाल्याचा घणाघात शाझिया इलमी यांनी केली. शाझिया इलमी म्हणाल्या की, ''विभव कुमारला केजरीवाल संरक्षण देऊ पाहत आहेत. स्वाती मालीवाल दीर्घकाळ आपसोबत आहेत, पक्षाच्या वाढीत त्यांचे सुरुवातीपासून मोठे योगदान आहे. मात्र तरीही स्वाती मालीवाल यांना अत्यंत वाईट पद्धतीने वागणूक देण्यात आली. गैरवर्तन झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी संजय सिंह म्हणाले होते की, त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल मात्र त्यांच्यावर अद्याप कुठलीही कारवाई झाली नाही. स्वाती मालीवाल याच्याशी गैरवर्तन करणारे विभव कुमार दिल्लीचे शहाजहा शेख आहेत आणि केजरीवाल त्यांचे सुलतान आहेत,'' असा सणसणीत टोलाही त्यांनी लगावला. शहजाद पूनावाला म्हणाले की, ''केजरीवाल यांनी स्वाती मालीवाल प्रकरणावर आपले मौन सोडावे आणि नाटक करण्याऐवजी मूळ प्रश्नांची उत्तरे द्यावीत. त्यांनी विभव कुमारला संरक्षण दिले का? त्यांच्या घरचे सीसीटीव्ही फुटेज का गायब आहे? एक छोटी क्लिप का प्रसिद्ध झाली आणि पूर्ण व्हिडिओ का नाही?'' असे सवाल करत अरविंद केजरीवाल यांच्यावर जोरदार टीका केली.

भारतीय रेल्वेचे ७० टक्के खासगीकरण प्रकाश आंबेडकर यांचा भाजपावर आरोप

मुंबई । प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाला माझे आव्हान आहे की, मी जी माहिती देत आहे ती खोटी आहे म्हणून सांगा. २०१४ ला भारतीय रेल्वे १०० % सरकारची आणि भारतीयांची होती. २०२४ मध्ये निवडणुका होत आहेत, या दहा वर्षांच्या कालावधीत भारतीय रेल्वेचे ७०% खासगीकरण झाले आहे, ३०% च सरकारी असल्याचे प्रतिपादन वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केले.

प्रकाश आंबेडकर म्हणाले की, नरेंद्र मोदी म्हणतात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जरी आले तरी घटना बदलू शकत नाहीत. बाबासाहेब १९५६ साली आमच्यातून निघून गेले. अजूनपर्यंत चमत्कार झालेला नाही की, गेलेला माणूस परत येतो. त्यामुळे बाबासाहेब परत येणार नाहीत. त्यामुळे बाबासाहेबांच्या नावाने आश्वासन देऊ नका, मोदी तुम्ही सांगा की, तुम्ही घटना

बदलणार आहे की नाही याचा खुलासा करा. बांधवांनो, तो खुलासा झाला नाही तर लक्षात ठेवा हे भाजपा-आरएसएस घटना बदलणार आहेत. पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, १५० वर्षांनंतर सुद्धा महात्मा फुले यांच्याबद्दल अपशब्द का बोलले जातात? तर या देशाच्या विषमतावादी सामाजिक व्यवस्थेला महात्मा फुले आणि सावित्रीमाई फुले यांनी सुरुंग लावला हे लक्षात घ्या. त्यांनी फक्त नुसता सामाजिक बदल केला नाही, तर इथल्या शेतकऱ्यांना जागृत करण्याचे कार्य सुद्धा केले आणि स्वतःच्या अधिकारासाठी लढायला सांगितल्याचे अधोरेखित केले.

प्रकाश आंबेडकर म्हणाले की, सर्वोच्च न्यायालय म्हणत आहे की, सरकारने जो इलेक्ट्रोल बॉंड काढला आणि त्याच्यातून वीस हजार कोटी जमवले ही पद्धत घटनाबाह्य आहे. गावातील दादा जसा दुकानदाराकडून वसूली करतो. तशाच पद्धतीने यांनी सुद्धा वसुली केल्याचा आरोप करत राजकीय सार्वभौम टिकवून ठेवायचे असेल, तर आर्थिक कणा मजबूत असायला पाहिजे. आर्थिक कणाच कमकुवत असेल, तर आपल्याला नांगी टाकावी लागत असल्याचेही त्यांनी सांगितले.

नाशिकमध्ये सत्ताधारी पक्षाकडून पैसे वाटप?

ठाकरे गटाच्या आरोपाने खळबळ

नाशिक । प्रतिनिधी

लोकसभा मतदारसंघात सोमवारी (दि.२०) मतदानाची प्रक्रिया पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर राजकारण तापले असून नाशिकमध्ये सत्ताधारी पक्षाकडून पैसे वाटप सुरु असल्याचा गंभीर आरोप शिवसेना ठाकरे गटाकडून करण्यात आला आहे. यामुळे नाशिकमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

नाशिक लोकसभा मतदारसंघात तिरंगी लढत पाहायला मिळणार आहे. शिवसेना शिंदे गटाकडून विद्यमान खासदार हेमंत गोडसे तर शिवसेना ठाकरे गटाकडून सिन्नरचे माजी आमदार राजाभाऊ वाजे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. तर अपक्ष उमेदवार शांतीगिरी महाराजांचे महायुती आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांना तगडे आव्हान असणार आहे. त्यातच आता शिवसेना ठाकरे गटाचे नाशिक जिल्हाप्रमुख सुधाकर बडगुजर यांनी सत्ताधारी शिवसेना शिंदे गटावर गंभीर आरोप केला आहे.

सुधाकर बडगुजर म्हणाले की, सत्ताधारी पक्षाकडून नाशिकमध्ये पैसे वाटप सुरु आहे. त्यांच्या पैसे वाटप करणाऱ्या टीमवर आमच्या शिवसैनिकांची करडी नजर आहे. पैसे घेऊन निघाले की आमचे भरारी पथक कामाला लागेल. त्यांच्याकडे माणसं असतील पण पैसे वाटप करणे इतके सोपे नाही. मतदारांपर्यंत पोहोचणे अवघड आहे. प्रत्येक चौकाचौकात आमचे शिवसैनिक तैनात आहेत, असे त्यांनी म्हटले आहे.

दरम्यान, नाशिकमध्ये प्रचाराच्या अखेरच्या दिवशी शिवसेना शिंदे गट आणि शिवसेना ठाकरे गट आमनेसामने आल्याचे पाहायला मिळाले. नुकतेच ठाकरे गटातून शिंदे गटात दाखल झालेल्या विजय करंजकरांच्या भगूर गावातून महाविकास आघाडीची प्रचार रॅली जात होती. यावेळी दोन्ही शिवसेनेचे कार्यकर्ते आमनेसामने आले. दोन्ही शिवसेनेकडून एकमेकांविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी पोलिसांनी मध्यस्थी करत वाद मिटवला.



ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांना हद्दपारीची नोटीस

ऐन निवडणुकीतच नाशिकमधील ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांना २० तारखेपर्यंत हद्दपारीची नोटीस बजावण्यात आली आहे. पदाधिकाऱ्यांना नोटीस मिळत असल्याने ठाकरे गटाने आक्रमक पवित्रा घेतला आहे. पोलिसांना हाताशी धरून दबाव टाकला जात असल्याचा आरोप ठाकरे गटाकडून करण्यात आला आहे. या आधी दाखल असणाऱ्या गुन्ह्याच्या पार्श्वभूमीवर नोटीस बजावत असल्याचा उल्लेख नोटीसीत करण्यात आला आहे.

पूंछमध्ये एनसीच्या रोड शो वेळी चाकू हल्ला, तिघे जखमी

श्रीनगर । वृत्तसेवा

जम्मू-काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यात रविवार (दि.१९) नॅशनल कॉन्फरन्सच्या (एनसी) रोड शोदरम्यान अज्ञात हल्लेखोरांनी केलेल्या चाकू हल्ल्यात तीन जण जखमी झाले. नॅशनल कॉन्फरन्सचे माजी आमदार जावेद राणा यांनी या घटनेला सुरक्षेतील मोठी त्रुटी असल्याचे म्हटले आहे.

नॅशनल कॉन्फरन्सचे प्रमुख फारुख अब्दुल्ला आणि अनंतनागमधील पक्षाचे उमेदवार मियाँ अल्ताफ राजौरी एका जाहीर सभेला संबोधित करत असताना मेंढर भागात ही घटना घडली. जखमी नॅशनल कॉन्फरन्सचे कार्यकर्ते आहेत. त्यांना मेंढरच्या उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. जखमींपैकी दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना राजौरी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आला आहे. या घटनेसंदर्भात बोलताना नॅशनल कॉन्फरन्सचे माजी आमदार जावेद राणा म्हणाले की, ''आमच्या तरुणांवर अशा सुरक्षेदरम्यान हल्ला झाला आहे. पोलिसांनी तत्काळ हल्लेखोरांना पकडून त्यांच्यावर कारवाई करावी.''

हिमाचलमध्ये भाजपला धक्का

देवेंद्र कुमार भुट्टो यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल

शिमला । वृत्तसेवा

हिमाचल प्रदेशातील विधानसभा पोटनिवडणुकीपूर्वी भाजपला मोठा धक्का बसला आहे. भाजपचे कुतलहार विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीचे उमेदवार देवेंद्र कुमार भुट्टो आणि त्यांच्या मुलाविरुद्ध देहरा पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामुळे भुट्टो यांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने (पीडब्ल्यूडी) केलेल्या तक्रारीनंतर ही कारवाई करण्यात आली आहे. पीडब्ल्यूडीने भाजप उमेदवार देवेंद्र भुट्टो आणि त्यांच्या मुलाने निविदा काढण्यासाठी बनावट कागदपत्रे दिल्याचा

आरोप केला आहे. पोलिसांनी दोघांवरही कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१ आणि १२०बी अन्वये गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, देवेंद्र भुट्टो यांचा मुलगा कर्ण हा सरकारी कंत्राटदार आहे. कर्णने निविदा काढण्यासाठी जोडलेली कागदपत्रे बनावट असल्याची तक्रार सार्वजनिक बांधकाम विभागाने केली होती. ही बाब निदर्शनास येताच विभागाने कर्णच्या नावाने काढलेली निविदाही रद्द केली होती. तर आता बांधकाम विभागाच्या तक्रारीवरून पोलिसांनी पिता-पुत्रावर गुन्हा दाखल करून कारवाई सुरू केली आहे.

निवडणुकीच्या काळात पोलिसांच्या या कारवाईमुळे भाजपचे उमेदवार भुट्टो यांच्या अडचणीत चांगलीच वाढ झाली आहे. दुसरीकडे, कांगराचे पोलिस अधीक्षक शालिनी अग्निहोत्री यांनी सांगितले की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तक्रारीवरून देवेंद्र कुमार भुट्टो आणि त्यांचा मुलगा कर्ण यांच्याविरुद्ध फसवणुकीच्या आरोपाखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील चौकशी सुरू करण्यात आली आहे. भुट्टो यांना त्यांचा जबाब नोंदवण्यासाठी संपर्क साधला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही, असे पोलिस अधीक्षकांनी सांगितले.

बारामुल्ला लोकसभा जागेवर सतरा लाखांहून अधिक मतदार करणार मतदान

भारतीय निवडणूक आयोगाची माहिती

श्रीनगर । वृत्तसेवा

बारामुल्ला लोकसभा मतदारसंघात २० मे रोजी मतदान होणार असून, या मतदारसंघात एकूण १७ लाखांहून अधिक मतदार मतदान करतील. भारतीय निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, मतदारसंघातील १८ मतदान क्षेत्रांमध्ये ८,७५,८३१ पुरुष आणि ८,६२,००० महिला मतदारांव्यतिरिक्त ३४ तृतीयपंथी मतदारांसह १७,३७,८६५ मतदारांनी नोंदणी केली आहे.

निवडणूक आयोगाने म्हटले आहे की, अंदाजे १७१२८ अपंग व्यक्ती आणि

१०० वर्षांवरील ५२७ व्यक्ती आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. पाचव्या टप्प्यात बारामुल्ला, कुपवाडा, बांदीपोरा आणि बडगाम या चार जिल्ह्यांमध्ये किमान २,१०३ मतदान केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. तर ८ हजारहून अधिक मतदान कर्मचारी या मतदान केंद्रावर कार्यरत असणार आहेत. दरम्यान, नॅशनल कॉन्फरन्सचे उपाध्यक्ष ओमर अब्दुल्ला पहिल्यांदाच बारामुल्ला मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. त्यांना टक्कर देण्यासाठी पीपल्स कॉन्फरन्सचे अध्यक्ष सज्जाद गनी लोन आणि अवामी इत्तेहाद पक्षाचे अभियंता रशीद निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.

स्थलांतरित मतदारांसाठी विशेष मतदान केंद्रे

काश्मीर विभागातील स्थलांतरित मतदारांसाठी आपल्या मतदानाचा हक्क बजावण्यासाठी विशेष मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत, असेही निवडणूक आयोगाने सांगितले. त्यानुसार, जम्मूमध्ये २१, दिल्लीत ४ आणि उधमपूर जिल्ह्यात एका मतदान केंद्रासह एकूण २६ विशेष मतदान केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. विशेष मतदान केंद्रनिहाय तयार केलेली मतदार यादी बीएलओकडे असेल, असेही आयोगाने म्हटले.

शरद पवार यांचा 'तो' गौप्यस्फोट खरा, प्रफुल्ल पटेल यांची उघडपणे कबुली

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यातील मतदानाला सुरुवात होण्यास अवघे काही तास शिल्लक असताना आता राष्ट्रवादीच्या दोन्ही गटाच्या प्रमुख नेत्यांकडून दावे-प्रतिदावे केले जात आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी 'लोकसत्ता' वृत्तपत्राला मुलाखत दिलीय. या मुलाखतीत त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांच्याबद्दल मोठा दावा केला. विशेष म्हणजे शरद पवारांचा संबंधित दावा खरा असल्याची कबुली खुद्द प्रफुल्ल पटेल यांनी दिली आहे. प्रफुल्ल पटेल यांनी ट्विट करत शरद पवारांच्या वक्तव्यावर खुलासा केला आहे. याचा अर्थ प्रफुल्ल पटेल यांना १९ वर्षांपासून भाजपसोबत

जाण्याची इच्छा होती हे आता स्पष्ट झालं आहे.

''प्रफुल्ल पटेल २००४ पासूनच भाजपसोबत जाण्यासाठी आग्रही होते. काँग्रेसबरोबर जाण्यास प्रफुल्ल पटेल यांनी विरोध केला होता. तरीदेखील युपीए सरकारमध्ये आम्ही पटेल यांना केंद्रीय मंत्रीपद दिलं. २००४च्या निवडणुकीच्या आधीपासून प्रफुल्लभाई सारखं सांगायचे की, या निवडणुकीत आपले पक्ष टिकणार नाहीत. वाजपेयींना पर्याय नाही. आपण सगळे भाजपमध्ये जाऊ, तासंतास त्यांनी आग्रह केला होता. शेवटी मी नाही म्हणून सांगितलं. तुम्ही जा म्हणून सांगितलं. शेवटी अक्षरशः त्यांच्या डोळ्यांत पाणी आलं'', असा मोठा दावा शरद पवार यांनी केला. त्यावर प्रफुल्ल पटेल यांनी स्पष्टीकरण दिलं.

निवडणूक आयोगाने जप्त केले ८ हजार ८८९ कोटी

निवडणूक आयोगाकडून माहिती जाहीर

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

लोकसभा निवडणुकीदरम्यान पाचव्या टप्प्यापर्यंत निवडणूक आयोगाने मोठी कारवाई केली आहे. लोकसभा निवडणूक जाहीर झाल्यापासून निवडणूक आयोगाने जवळपास ८ हजार ८८९ कोटींचे घबाड जप्त केले आहे. यामध्ये रोकडसह अवैध वस्तूंचा समावेश आहे. निवडणूक आयोगाकडून याबाबतची माहिती जाहीर करण्यात आली.

निवडणूक आयोगाच्या मते हा आकडा लवकरच ९ हजार कोटींचा टप्पा पार करणार आहे. निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार निवडणूक स्वच्छ आणि चांगल्या वातावरणात पार पडाव्यात, यासाठी विविध संस्थांनी आतापर्यंत ८ हजार ८८९ कोटींची मालमत्ता जप्त केली आहे. गेल्या ३ टप्प्यांतील प्रचार जोमात सुरू आहे. प्रलोभनाद्वारे मतदारांवर प्रभाव टाकण्याच्या प्रयत्नांवर कारवाई करण्यासाठी निवडणूक आयोगाने सीईओंना निर्देश दिले आहेत.

४५ टक्के हिस्सा ड्रग्जशी संबंधित

जप्त केलेल्या मालमत्तेमध्ये ४५ टक्के हिस्सा ड्रग्जच्या रुपाने जप्त करण्यात आला आहे. निवडणूक आयोगाने जप्त केलेल्या ८ हजार ८८९ कोटींचे घबाड जप्त केले. त्यापैकी ३९५८ कोटी रुपयांची मालमत्ता ड्रग्जसंबंधीची आहे. निवडणूक आयोगाच्या म्हणण्यानुसार सातत्याने पाठपुरावा, जिल्ह्यांचा सातत्यपूर्ण आढावा आणि यंत्रणांच्या दक्षतेमुळे १ मार्चपासून आतापर्यंत एवढी मोठी रक्कम जप्त केली.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दरोडा टाकणाऱ्या टोळीला बारा तासाच्या आत गुन्हे शाखेने केले जेरबंद

पुणे । प्रतिनिधी

हडपसर भागातील महमंदवाडी येथील बीजेएस ज्वेलर्स या सोन्या चांदीच्या दुकानात ५ ते ६ दरोडेखोरांनी दरोडा टाकला होता. सोने खरेदी करण्याच्या बहाण्याने पिस्तूल, लोखंडी रॉड व स्प्रे याचा धाक दाखवून दुकानातील अंदाजे ३०० ग्रॅम वजनाचे तयार सोन्याचे दागीने चोरी करुन पळून गेले होते. या प्रकरणाचा छडा लावत पोलीसांच्या गुन्हे शाखेने १२ तासांच्या आरोपींना बेड्या ठोकल्या.

या प्रकरणी सनी ऊर्फ योगेश हिरामण पवळे (वय २०, रा. ए.आर.ए.आय. रोड, वसंतनगर, खडेकश्वर मित्र मंडळाजवळ, केळेवाडी, पौड रोड, कोथरुड), सनी ऊर्फ आदित्य राजु गांडे, (वय १९), पियुष कल्पेश केदारी, (वय १८, रा. स.नं. १०३, जयप्रकाश नगर, माऊली चौक, डॉन बॉस्को हायस्कुल समोर, येरवडा, पुणे), ओमकार ऊर्फ ओम्या जगन वाल्हेकर (वय १९, रा. जयभवानीनगर, कोठ, पुणे), नारायण ऊर्फ नारु बाळु गवळी (वय २०, रा. टिळेकर नगर, इस्कॉन मंदिराव्यान, कोटया रोड, कात्रज, पुणे), मयुर चुन्नीलाल पटेल, (वय ५३, रा. स.नं. १४, पॉट नं.६ सरोकारे विडा नं. १, कामधेनु पार्क शेजारी), नासिर मेहमुद शेख (वय ३२, रा. घर नं. ३१६, चांभारंदाचा, वानवडी) या आरोपांनी पोलीसांनी ताब्यात घेतले आहे. १८ मे २०२४ रोजी दुपारी १२.१० वाजता महमंदवाडी येथील बीजेएस ज्वेलर्स नावाचे मॅजेस्टिक मेमरीज सोसायटी येथील गाळा नं.५३ येथे सोन्या चांदीच्या दुकानावर ५ते ६ दरोडेखोरांनी दरोडा घातला होता. त्यानुसार, वानवडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी गुन्हा उघडकीस आणण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्यानुसार गुन्हे शाखेचे अपर पोलीस आयुक्त आणि पोलीस उप आयुक्त यांच्या सुचनेप्रमाणे गुन्हे शाखेकडील युनिट ४, ५, ६. खंडणी विरोधी पथक १ व २, दरोडा व वाहन चोरी पथक २ कडील अधिकारी व पोलीस अंमलदार यांची १० पथके तयार करून समांतर तपास करण्याचे आदेश दिले होते. या गुन्ह्याचा समांतर तपास करत असताना पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना मिळालेल्या गोपनीय बातमीदारांचे व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपींना ताब्यात घेण्यात आले. ज्वेलर्स दुकानात जावून दुकानात असलेल्या व्यक्तींना चाकू व रिव्हॉल्वरची भीती दाखवुन त्यांना मारहाण करुन त्यांच्या दुकानातील दागिने चोरल्याचे आरोपींनी कबूली केले. त्यानुसार आरोपींच्या ताब्यात असलेले ६०१.१५ ग्रॅम वजनाचे सोने, २ दुचाकी, १ चारचाकी व ६ मोबाईल असा एकूण ४८ लाख ३० हजार ९१० रूपयांचा मुद्देमाल पोलीसांनी जप्त केले.

पोलीस आयुक्तांनी दिलेल्या आदेशानुसार गुन्ह्याचा तपास करण्यात आला. पोलीसांचे १० पथके तयार करण्यात आली होती. आरोपींकडून ६०१.१५ ग्रॅम वजनाचे सोने, २ दुचाकी, १ चारचाकी व ६ मोबाईल असा एकूण ४८ लाख ३० हजार ९१० रूपयांचा मुद्देमाल पोलीसांनी जप्त केले आहे. नगर, चाकण या ठिकाणावरुन सात आरोपी ताब्यात घेतले आहेत. १५ दिवसांपूर्वी या आरोपींनी एकत्रित ज्वेलर्सचे दुकान लुटण्याचा प्लॅन केला होता.

– अमोल झेंडे, पोलीस उपायुक्त, गुन्हे शाखा.

बदली झालेल्या न्यायाधीशांना सन्मानपूर्वक निरोप

पुणे । प्रतिनिधी

पिंपरी नेहरूनगर न्यायालयातील न्यायाधीश आर.एस.वानखेडे (प्रमुख न्यायाधीश), आर.एम गिरी, पी.सी.फटाले, एस.पी.कुलकर्णी यांच्या विविध ठिकाणी बदल्या झाल्या आहेत. त्या निमित्त पिंपरी चिंचवड डव्होकेट असोसिएशनच्या वतीने वकील बार रूम मध्ये निरोप समारंभ तसेच सालाबाद प्रमाणे आईस्क्रीम पार्टीचे आयोजन करण्यात करण्यात आले होते. न्यायाधीश आर.एस.वानखेडे (प्रमुख न्यायाधीश), आर.एम गिरी, पी.सी.फटाले, व्ही.एन.गायकवाड,ए.एम. बगे साहेब, यांचे सत्कार असोसिएशन चे आजी माजी पदाधिकारी व जेष्ठ वकील मान्यवर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. या वेळी ड.जे.के काळभोर, माजी अध्यक्ष ॲड.नारायण (नाना) रसाळ, ॲड.सुनिल कडूसकर, ॲड.प्रतिक जगताप, ॲड.अरुण (मामा) खरात, ॲड.बी.के कांबळे, ॲड.राकेश अकोले, ॲड.समीर चव्हाण, ॲड.प्रताप साबळे, ॲड.संभाजी वाघमारे यांनी बदली झालेल्या साहेबांसंदर्भात मनोगत व्यक्त करून साहेबांबाबतच्या जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन पिंपरी चिंचवड डव्होकेट असोसिएशनच्या अध्यक्षा ॲड.प्रमिला गाडे, उपाध्यक्ष ॲड.गोरख कुंभार, महिला सचिव ॲड.वर्षा तिडके – कांबळे, सदस्य ॲड.जयेश वाकचौरे, ॲड.साक्षी धुमाळ, ॲड.तेजश चवरे, ॲड.विशाल पौळ यांच्याकडून करण्यात आले.यावेळी ॲड.संजना माने, ड.माणगावकर, ॲड.संगीता कुशलकर, ॲड. पूनम शर्मा, ॲड.शीला दळवी, ॲड.नारायण थोरात, ॲड.अधिक चरेगावकर, ॲड.पवन गायकवाड, ॲड.वाघुडे, इ.वकील मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. तेजस चवरे यांनी केले आभार प्रदर्शन ॲड.गोरख कुंभार यांनी केले.

कलाक्षेत्रातील गुरुकुल परंपरा जतन करणे आवश्यक : डॉ. विजय भटकर

अनुबंध प्रकाशन प्रकाशित उस्ताद उस्मान खान यांच्या 'जर्नी इन ड्रीम' आत्मचरित्राचे प्रकाशन

पुणे । प्रतिनिधी

भारतात आजही लहान-मोठ्या प्रमाणात गुरुकुल पद्धतीने संस्कृती व परंपरा जपली जात आहे. ही परंपरा जीवंत ठेवण्यासाठी आधुनिक युगातील नवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अनेक आविष्कार घडावेत व ही परंपरा प्रवाही ठेवण्यासाठी प्रयत्न व्हावेत, अशी अपेक्षा ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ पद्मभूषण डॉ. विजय भटकर यांनी व्यक्त केली. 'जर्नी इन ड्रीम' या पुस्तकाद्वारे उस्ताद उस्मान खान यांच्याशी प्रत्यक्ष हितगुज करीत आहोत अशी भावना हे पुस्तक वाचताना होते, असेही त्यांनी आवर्जून सांगितले.

अनुबंध प्रकाशन प्रकाशित ज्येष्ठ सतारवादक उस्ताद उस्मान खान यांचे आत्मचरित्र असलेल्या 'जर्नी इन ड्रीम' या पुस्तकाचे प्रकाशन शनिवारी (दि. १८) डॉ. भटकर यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. शकुंतला शेट्टी सभागृहात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी होत्या. अनुबंध प्रकाशनचे संचालक अनिल कुलकर्णी, पुस्तकाच्या शब्दांकनकर्त्या स्वाती प्रभुमिराशी, क्षितिज पाटुकले, नूरजहाँ खान पुस्तकप्रकाशन प्रसंगी उपस्थित होते.

भारतात ज्याप्रमाणे वेदांच्या परंपरा जपल्या जात आहेत त्या प्रमाणेच कलाक्षेत्रात ज्ञानदान करणारी गुरुकुल परंपराही जतन करणे आवश्यक आहे, असे सांगून डॉ. भटकर म्हणाले, याकरिता भारतातील अनेक ठिकाणी गुरुकुल पद्धतीने ज्ञानदान करणाऱ्या संस्था एकत्रित करून भारत विश्वज्ञानपीठ स्थापन करावे अशी आपली इच्छा आहे. या विश्वज्ञानपीठातून उस्तादजींसारखे अनेक दिग्गज गुरू आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सर्व विश्वातील शिष्यांना मार्गदर्शन करू शकतील आणि ही पारंपरिक विरासत टिकविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचे सहाय्य होईल.

अध्यक्षीय मनोगत व्यकत करताना डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, प्रत्येक कलाकाराचे रसिकाशी अनोखे अनुबंध असतात. कलाकारापेक्षाही रसिक भाग्यवान असतो कारण तो कलेचा रसास्वाद घेऊ शकतो. प्रत्येक गोष्टीचे उन्नयन करायला कला आपल्याला प्रेरित करीत असते. तसेच अंतर्मुख होऊन विचार करण्याची प्रक्रियाही संगीत कला शिकविते. त्या पुढे म्हणाल्या, 'जर्नी इन ड्रीम' पुस्तकाचे बाह्य व अंतरंग सर्वांगसुंदर आहे. उस्तादजींच्या बोलण्यातील ओघ शब्दांकनकर्त्यांनी उत्तमरित्या प्रकट केला आहे. पुस्तकातील अनेक प्रसंग अतिशय भावपूर्ण आहेत. कष्टसाध्य यशाचा आनंद किती जास्त प्रमाणात मिळतो, कलाकाराची जडणघडण कशी होते याविषयी या पुस्तकातून अनेक गोष्टी उलगडत जातात. उस्तादजींसारखी व्यक्तीमत्त्वे म्हणजे देशाला लाभलेली देणगी आहे. पुढच्या पिढीला कला क्षेत्रात प्रोत्साहित करून मार्गदर्शन देणारी व्यक्तीमत्त्वे गुरुतुल्यच आहेत.

मनोगत व्यक्त करताना उस्ताद उस्मान खान म्हणाले, माझा जगण्याचा प्रवास स्वप्नवत आहे. शास्त्रीय संगीतात जगणे इतके सोपे नाही. या स्वप्नातील प्रवासाकडे पाहताना मी कुठे होतो आणि कुठवर आलो हे माझ्याचदृष्टीने अनाकलनीय आहे. विश्वात आपल्या देशाविषयी मत मांडताना संगीताचे ज्ञान अत्यावश्यक आहे, असे वाटल्याने मी लहान मुलांना संगीताचे प्राथमिक शिक्षण देत आहे, याचा उल्लेख त्यांनी आवर्जून केला.

प्रास्ताविकात अनिल कुलकर्णी यांनी अनुबंध प्रकाशनाच्या वाटचालीचा आढावा घेतला. दर्जेदार पुस्तके शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी लोकप्रतिनिधींनी सहकार्य करावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

स्वाती प्रभुमिराशी म्हणाल्या, मी गुरुजींसोबत दोन वर्षे आनंददायी क्षण जगले याविषयी कृतज्ञ आहे. हे संचित मला आयुष्यभर पुरणारे आहे. गुरुजी फक्त संगीतच नाही तर जगावे कसे हे देखील शिकवितात. मान्यवरांचा सत्कार अनिल कुलकर्णी, अस्मिता कुलकर्णी यांनी केला. तर पुस्तक निर्मिसाठी सहाय्यक ठरलेल्या व्यक्तींचा सत्कार डॉ.विजय भटकर, उस्ताद उस्मान खान, डॉ. प्रा. मेधा कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला. सूत्रसंचालन माधुरी कुलकर्णी यांनी केले तर आभार अस्मिता कुलकर्णी यांनी मानले. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात तीन पिढ्यातील सतारवादनाचा प्रवास दर्शविणारा स्वरविराजस हा कार्यक्रम सादर करण्यात आला. उस्ताद उस्मान खान, रुकिया खान-देशमुख, माध्यमी देशमुख यांचे बहारदार सतारवादन झाले. त्यांना डॉ. अतुल कांबळे यांनी समर्पक तबलासाथ केली.

वानवडी परिसरातील वारकर मळा येथील बीजीएस ज्वेलर्सवर भरदिवसा दरोडा

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील वानवडी परिसरात दिवसाढवळ्या एका सोन्याच्या दुकानावर ६ ते ७ जणांनी दरोडा टाकून लाखो रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना घडली आहे. ही घटना वानवडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत शनिवारी (दि.१८) दुपारी बाराच्या सुमारास वानवडी येथील बी.जी.एस. ज्वेलर्स येथे घडली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. ही घटना सीसीटीव्ही मध्ये कैद झाली आहे. पुणे शहरामध्ये दिवसेंदिवस चोरी, जबरी चोरी, मारामारी, दरोड्याचे प्रमाण वाढत आहे. वानवडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मोहमदवाडी रोडवरील वारकर मळा येथील पीजीएस ज्वेलर्सच्या दुकानात दुपारी बाराच्या सुमारास सात अनोळखी तरुण तोंडाला मास्क लावून आले. त्यांनी दुकानात असेलल्या व्यक्तीला मारहाण करुन दरोडा टाकला. दरोडेखोरांनी दुकानातील ३०० ते ४०० ग्रॅम वजनाचे सोने चोरून नेले. आरोपी दुचाकीवरुन आले होते. दरोडा टाकल्यानंतर ते दुचाकीवरुन पसार झाले.

घटनेची माहिती मिळताच गुन्हे शाखेचे अप्पर पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे,

पोलीस उपायुक्त अमोल झेंडे, पोलीस उपायुक्त आर राजा, सहायक पोलीस आयुक्त इंगळे यांच्यासह स्थानिक पोलीस अधिकारी, गुन्हे शाखेचे अधिकारी यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी दुकानातील सीसीटीव्ही ताब्यात घेऊन पसार झालेल्या आरोपींचा शोध सुरु केला आहे. आरोपींचा शोध घेण्यासाठी तपास पथके रवाना करण्यात आली आहेत. पुढील तपास वानवडी पोलीस करीत आहेत.

स्टील मटेरियल न देता कंपनीची ३४ लाख ३५ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक

पुणे । प्रतिनिधी

पर्चेस ऑर्डर घेवून स्टील मटेरीयलचा पुरवठा न करता ३४ लाख ३५ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. हा प्रकार ऑक्टोबर २०२२ ते १७ मे २०२४ कालावधीत घोरपडी येथील एबीआयएल बुलवार्ड कंपनीत घडला आहे. याप्रकरणी मुंढवा पोलिसांनी दोघांवर गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत श्रीधर मोहन दुमाळे (वय-५० रा. रायकर पार्क, सिंहगड रोड पुणे) यांनी मुंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यावरुन छगनलाल गुलाबचंद गुंदेशा (वय-६०), निरज छगनलाल गुंदेशा (वय-३१ दोघे रा. भवानी पेठ, पुणे) यांच्यावर भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, ३४ नुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हे विविध कंपनीचे स्टीलचे अधिकृत विक्रेते आहेत. त्यांनी फिर्यादी काम करत असलेल्या कंपनीचा विश्वास संपादन केला. आरोपींनी फिर्यादी यांच्या कंपनीकडून स्टीलची ऑर्डर घेऊन फिर्यादी यांच्या कंपनीच्या साईटवर मालाचा पुरवठा करण्याचे आश्वासन दिले. त्यानुसार आरोपींनी फिर्यादी यांच्या कंपनीकडून ६२ लाख ६७ हजार ८६४ रुपये घेतले. त्यापैकी २८ लाख ३२ हजार ८४९ रुपयांचे स्टिल फिर्यादी यांच्या कंपनीच्या साईटवर पोहोच केले.

मात्र, उर्वरीत ३४ लाख ३५ हजार ०१५ रुपयांचे स्टील न देता उर्वरित रक्कम स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी वापरली. फिर्यादी यांनी आरोपींकडे पैशांची मागणी केली. त्यावेळी आरोपींनी फसवणूक करण्याच्या उद्देशाने चेकवर खोट्या सह्या करुन फिर्यादी यांना दिले. चेक वटले नसल्याने फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादी यांनी मुंढवा पोलिसांकडे तक्रार दिली. आरोपींनी खोटे चेक देऊन फिर्यादी यांच्या कंपनीची आर्थिक फसवणूक केली. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

विद्यार्थ्यांनी अनुभवला समृद्ध सांस्कृतिक वारसा

जागतिक संग्रहालय दिनानिमित्त साईनाथ मंडळ ट्रस्ट व श्री शिवाजी मित्र मंडळाचा उपक्रम

पुणे । प्रतिनिधी

कोरीव काम असलेला लाकडी रथ, भव्य समया, दुर्मिळ-आकर्षक दिवे, पालख्या, चांदीचे देव्हारे, वैविध्यपूर्ण आभुषणे, पैठण्या, लाकडी शिल्पे, चित्रनगरीचा प्रवास दाखविणारी पोस्टर्स, जगप्रसिद्ध चित्रकारांची रंगचित्रे, दुर्मिळ ग्रामोफोन, सायकली असा समृद्ध सांस्कृतिक ठेवा विद्यार्थ्यांना झपूर्झा मधील विविध दालनांमधून पहायला मिळाला.

निमित्त होते जागतिक संग्रहालय दिनानिमित्त साईनाथ मंडळ ट्रस्ट व श्री शिवाजी मित्र मंडळ यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या झपूर्झा संग्रहालय भेटीचे. कुडजे गावा येथील झपूर्झा संग्रहालय, नळ स्टॉप जवळील अग्निशमन संग्रहालय व घोले रस्त्यावरील महात्मा फुले संग्रहालय अशा तीन संग्रहालयाची सफर आज सात ते चौदा वर्षे वयोगटातील शालेय विद्यार्थ्यांना घडविण्यात आली. अग्निशमन संग्रहालयातील उपकरणे, फुले संग्रहलयातील शस्त्रास्त्रे पाहून विद्यार्थी अचंबित झाले. विद्यार्थ्यांचे बौद्धिक भरणपोषण व्हावे या उद्देशाने या सफरीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची संकलपना साईनाथ मंडळ ट्रस्ट चे अध्यक्ष पीयूष शाह यांची होती.

झपूर्झा संग्रहालयाचे प्रमुख अजित गाडगीळ व अग्निशमन संग्रहालयातील अधिकारी राजेश जगताप यांचा या वेळी सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. पीयूष शाह म्हणाले की आपला समृध्द वारसा विद्यार्थ्यांना समजावा, पुणे शहर हे संग्रहालयाचे शहर म्हणून प्रसिद्ध व्हावे इतकी उत्तम संग्रहालय पुण्यात आहेत, सर्वांनी ती आवर्जून पहावी ह्या हेतूने मागील दहा वर्षे आपण संग्रहालय दिवस साजरा करत आहोत आणि वर्षभर विद्यार्यांना विविध संग्रहालय दाखवत असतो. साईनाथ.मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष पीयूष शाह व श्री शिवाजी मित्र मंडळाचे अध्यक्ष प्रल्हाद थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली या सफरीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी दगडूशेठ हलवाई ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, श्री शनी मारुती मंडळाचे सचिन पवार, प्रथमेश अदमुलवार, गंधाली शाह, विजया निंबाळकर, नरेंद्र व्यास, सतीश नहार, ऋत्विक अदमुलवार आदी उपस्थित होते. एन ई एम एस शाळेतील पालकांचे सहकार्य लाभले.

भोसरीत कोयता गँगचा धुडगूस

'आम्ही इथले भाई आहोत' म्हणत दोघांना कोयत्याने मारहाण

पिंपरी । प्रतिनिधी

जुन्या भांडणातून सहा जणांच्या टोळीने दोघांना कोयत्याने बेदम मारहाण केली. कोयता हवेत फिरवून 'आम्ही इथले भाई आहोत' असे म्हणत परिसरात दहशत निर्माण केली. ही घटना १६ मे रोजी सायंकाळी भोसरीतील चक्रपाणी वसाहतीत घडली.

याप्रकरणी ओंकार मल्हारी दळवी (वय २२, रा.दिघी), योगेश जगन्नाथ मुळे (वय २१), गणेश कृष्णा गवारी (वय १९, दोघे रा. चक्रपाणी वसाहत, भोसरी), विजय विरेंद्र चव्हाण (वय १८, रा.सदुरूनगर, भोसरी) या चौघांना अटक केली आहे. तेजस डोंगरे आणि सचिन येरे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत विशाल विठ्ठल साळवे (वय १९, रा. भोसरी) याने भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

फिर्यादी विशाल हा भोसरीतील देवकर वस्ती येथे थांबला होता. त्यावेळी आरोपी योगेश, विजय तेथे आले. जुन्या भांडणाचा राग मनात धरून विशालसोबत वाद घालण्यास सुरुवात केली. योगेशने ओंकारला बोलावून घेतले. आरोपी ओंकार याने हातात कोयता घेऊन तुम्ही आमच्या गँगला दम देता काय असे म्हणत शिवीगाळ केली. आरोपींनी विशाल याला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच विशालचा साथीदार लक्ष्मण आखाडे याला पकडून ठेवले. आरोपी ओंकार याने विशालच्या पाठीत आणि लक्ष्मण याच्या डोक्यात कोयता मारून गंभीर जखमी केले. तसेच कोयता हवेत फिरवून मी आताच 'मोक्का'मधून बाहेर आलो आहे, आम्ही इथले भाई आहोत असे म्हणत परिसरात दहशत निर्माण केली. भोसरी पोलीस तपास करीत आहेत.